शनिवार, २५ फेब्रुवारी २०२३

⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१८१

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●SATURDAY 25 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-181 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5


# कणेरी मठात पत्रकाराला मारहाण

## शिळे अन्न खाऊ घातल्याने अनेक गायींचा मृत्यू : ३० गायी अस्वस्थ; अधिकृत आकडा देण्यास टाळाटाळ

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर : कणेरी मठातील गायींना शिळे अन्न खाऊ घातल्याने अनेक गायींचा मृत्यू झाला असल्याच्या धक्कादायक घटनेने एकच खळबळ उडाली आहे. तसेच अनेक गायींची स्थिती अजूनही गंभीर असून त्यांच्यावर पशुवैद्यकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेचे चित्रीकरण करण्यास गेलेल्या पत्रकारांना मज्जाव करीत मठातील स्वयंसेवकांकडून मारहाण करण्यात आली. चित्रीकरण करू नये, या घटनेची बातमी देऊ नये, यासाठी ही मारहाण करण्यात आल्याचे बोलले जात आहे. तसेच अधिकृतपणे किती गायींचा मृत्यू झाला हे देखील सांगण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे.**

पंचमहाभूत लोकोत्सव प्रदर्शन बघण्यास येणाऱ्या नागरिकांना देण्यात येणारे जेवण हे मोठ्या प्रमाणात शिल्लक पडल्याने सदरचे शिळे जेवण हे गायींना खाऊ घातल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती जाणकारांकडून समोर आली आहे.याठिकाणी संबंधित घटनेच्या माहितीचे वार्तांकन करण्यासाठी पोहोचलेल्या पत्रकारांना मठाच्या स्वयंसेवकांकडून मारहाणीचा संतापजनक प्रकार घडला आहे.

गायींच्या मृत्यूची माहिती मीडियापासून लपवण्यासाठी कणेरी मठाच्या वतीने दबावतंत्रांचा वापर करण्यात येत आहे. या प्रकरणी गोकुळ शिरगाव, एमआयडीसी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. तसेच संबंधित स्वयंसेवकांवर त्वरित कारवाई व्हावी, अशी मागणीही पत्रकार संघटनांकडून करण्यात आली आहे.

कणेरी मठात सुरू असलेल्या पंचमहाभूत लोकोत्सवासाठी कोट्यवधींचा निधी खर्च करण्यात येत आहे . या लोकोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले होते . सध्या या कार्यक्रमात अनेक नेते, राज्यपाल हजेरी लावत आहेत .

पर्यावरणाचे महत्त्व व प्राण्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी येथे प्रदर्शन भरवण्यात आले आहे . विविध खाद्यपदार्थांचे स्टॉलही येथे लावण्यात आले आहेत . या प्रदर्शनाकडे नागरिकांनी पाठ फिरवल्याने रोज हजारो किलोचे जेवण वाया जात आहे . यामुळे यातील भाकरी, चपाती व इतर उरलेले अन्न येथील जनावरांना खाऊ घातले जात आहे . या प्रकारामुळेच गायींचा मृत्यू झाल्याची चर्चा होत आहे .









# औशाची आमसभा अनेक कारणांनी गाजणार

## आमदार दोन पण तक्रारी असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार कोण?

आधुनिक केसरी न्यूज

**महेश कोळी**

**औसा :** औसा पंचायत समितीचे सन 2022-2023 चे ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच सदस्य व अशासकीय व्यक्ती यांचे संम्मेलन/ आमसभा औशाचे आ. अभिमन्यू पवार यांच्या अध्यक्षतेखाली व लातूर ग्रामीण चे आ.धिरज विलासराव देशमुख, यांच्या सहअध्यक्षतेखाली दि.25/02/2023 रोजी दु. 1 वा. पंचायत समिती, औसा येथे विविध विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजीत करण्यात आले आहे. औसा तालुक्यातील ही पहिलीच आमसभा आहे जे की दोन आमदार उपस्थित राहणार असल्यांने संपुर्ण तालुक्यांच्या नजरा या आमसभेतील विषयांवर लागल्या आहेत.औशात मागील काही दिवसांपासून नरेगा मधील विकास कामांना चांगलीच खीळ बसली असून औशांतील नरेगा विभागातील काही कर्मचारी यांच्या तक्रारी अनेक दैनिकांत छापून ही आजपर्यंत त्यावर कसल्याही प्रकारची कारवाई झाली नाही. त्यामुळे हा विषय आता दोन आमदार महोदय कसे हाताळत कारवाई करणार कोण याकडे संपूर्ण तालुक्यांचे लक्ष लागले असून संबंधित विभागतील कर्मचारी यांला लगाम लावतील की नाही हे पहाणे गरजेचे आहे. तसेच घरकुल विभागाची पण अनेक तक्रारी असून त्यामुळे नागरिकांना नाहाक तालुक्याला येऊन चकरा माराव्या लागत आहेत. त्यामुळे आजच्या आमसभेत पंचायत समिती मधील नरेगा व घरकुल विभागावर चर्चा होण्याची दाट शक्यता असून यामधील तक्रारी असलेल्या कर्मचाऱ्यांवर काय कारवाई होईल हे पहाणे गरजेचे आहे. नरेगा विभागास काही संबंधित अधिकारी यांच्यामुळे ग्रहण लागले असून चुकीची माहिती देऊन सरपंच,व कर्मचारी यांना कसे अडकवता येईल यामध्ये पटाईत असून, पंचायत समितीच्या कुण्याही कर्मचारी यांच्यात हा कर्मचारी आल्यापासून शिस्तीचं राहिली नाही. त्यामुळे औशाचे कर्तबगार व दक्ष आमदार तसेच लातूर ग्रामीण चे आमदार या प्रकरणाकडे कसे पाहतील हे पाहणे गरजेचे आहे. ज्या पद्धतीने गावोगावी ग्रामसभा घेतली जाते त्याच पद्धतीने तालुकास्तरावर विविध गावचे प्रश्न या आमसभेद्वारे मांडले जातात. त्यामुळे नागरिकांचे प्रश्न रेंगाळल्यान चर्चा आहे. वास्तविक पाहता दरवषी तालुकास्तरावर जानेवारी से मार्च दरम्यान आमसभा घेण्याचा नियम आहे. दरवर्षी मार्च महिन्यात राज्याचे आर्थिक बजेट सादर केले जाते. त्याआधी टंचाई आराखडा तसेच विविध गावच्या मागण्या संदर्भात प्रस्ताव तसेच तक्रारी यावरही या सभेमध्ये जाहीर चर्चा केली जाते. या सभेला तालुक्यातील सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित राहतात पुढील वर्षांच्या कामाचे नियोजन तसेच सध्या सुरू असलेल्या कामांची स्थिती, मागच्या आमसभेत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली किंवा नाही यावरही चर्चा या सभेद्वारे केली जाते. बऱ्याचदा या सभेत लोकप्रतिनिधींकडून अधिकाऱ्यांना धारेवर धरले जाते आणि त्यांच्याकडून प्रश्नांची सोडवणूक केली जाते. परंतु, मागील वर्षी ही आमसभाच झाली नसल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले असून, अधिकारी सुसाट झाले असून त्यांच्यावर कसलेही बंधने राहिले नाहीत.

मागील आमसभेत 2020 मध्ये मतदारसंघातील सरपंच, उपसरपंच सदस्य यांच्यासह नागरिकांनी विविध समस्या आ .पवार यांच्यासमोर मांडल्या . संभाव्य पाणीटंचाई, शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करणे, ३० खेडी पाणीपुरवठा योजना, स्मशानभूमी, भूकंपग्रस्त गावांच्या समस्या यावर या बैठकीत प्रामुख्याने चर्चा झाली . बहुतांश समस्यांचे निराकरण 12/02/2020 आमसभा बैठकीतच आ .पवार यांनी केले . नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण सदैव तत्पर असून, माझे दरवाजे सर्वांसाठी कायमच खुले आहेत . आगामी काळात नागरिकांच्या समस्या अधिक गतिमान पद्धतीने सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे .

गावपातळीवर तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक हे बहुतांश समस्या सोडवू शकतात . नागरिकांना सन्मानाची वागणूक देत त्यांनी अधिक पारदर्शक पद्धतीने काम करण्याच्या सूचना आ . पवार यांनी देत शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासाठी विशेष मोहीम लवकरच हाती घेण्यात येणार आहे . आगामी काळात मतदारसंघातील सर्व रस्ते अतिक्रमण मुक्त असतील याची ग्वाही त्यांनी दिली ते यात यशस्वी झाले . औसा तालुका शेतरस्ता पॅटर्न संपुर्ण महाराष्ट्राला दिशादर्शक केला . आज त्यांनी केलेल्या शेतरस्त्यामुळे हजारो शेतकऱ्यांचे मार्ग सुखकर झाल्याने पवार यांची शेतरस्त्यामुळे संपूर्ण मतदार संघात लोकप्रियता वाढली आहे .

# युवा मित्र-मैत्रिणींशी संवाद साधल्याचे समाधान


## एमपीएससी विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींनी घेतली शरद पवारांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : एमपीएससी विद्यार्थ्यांच्या प्रतिनिधींनी आज मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर इथे आदरणीय शरद पवार यांची भेट घेतली. युवावर्गातील मित्र-मैत्रिणींशी त्यांच्या भविष्यातील वाटचालीबाबत संवाद साधल्याचे समाधान शरद पवार यांनी यावेळी व्यक्त केले. एमपीएससी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला जेव्हा पुण्यात भेट दिली त्याचवेळी मुख्यमंत्री व महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रमुख अधिकाऱ्यांशी चर्चा केली असे शरद पवार म्हणाले. या दोघांशी संवाद साधल्यानंतर त्यातून मार्ग निघेल अशी खात्री झाली. यात श्रेय कोणी घ्यायचे हा माझ्यादृष्टीने विषय नाही. यात दोघांनीही सहकार्य केले असे स्पष्ट मत शरद पवार यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या या भेटीनंतर शरद पवार यांनी माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तरे दिली. मतदार कुठे गेले असतील तर त्यांनी निवडणुकीसाठी यावे, असे आवाहन करण्यात चुकीचे नाही. जर मतदार नसेल तर त्यासंबंधी हरकत घेणे योग्य आहे. एखाद्याच्या भाषणावर हरकत घेणे म्हणजे कळत-नकळतपणे त्याला जातीय रंग देण्याचा हा प्रयत्न आहे असा थेट हल्लाबोल शरद पवार यांनी भाजपने घेतलेल्या आक्षेपावर केला. ज्यावेळी यशासंबंधी शंका तयार होते तेव्हा जात,पात,धर्म या चुकीच्या गोष्टींकडे आपला प्रचार वळवण्याचे काम भाजपसाठी नवे नाही. यापूर्वीही असे अनेकदा झाले आहे याची आठवणही शरद पवार यांनी करुन दिली. कसब्यामध्ये मिळालेली माहिती जरी अधिकृत नसली तरी, या निवडणुकीत सत्ताधारी पक्षाकडून जे अर्थकारण होतंय ते यापूर्वी कधी बघितले नाही असे लोक सांगतात. याचा अर्थ कोणत्याही टोकाला जाऊन ही निवडणूक हातात घ्यावी, असे चित्र सत्ताधारी लोकांचे असावे असे सांगतानाच भाजपमधले सगळेच लोक आवडण्यासारखे आहेत असे मला वाटत नाही. इतकी वर्षे मी भाजपवाल्यांना बघत आहे, त्यांना युतीत यावे असे वाटत नाही. त्यामुळे माझ्याबाबत होणारी विधाने ही अतिशय पोरकट आहेत असे प्रत्युत्तर शरद पवार यांनी दिले.



कापूस आणि सोयाबीन या दोन क्षेत्रांची स्थिती अतिशय गंभीर आहे . हे पीक घेणाऱ्या काही भागाचा दौरा केला असता तेथील स्थानिक लोकांच्या अतिशय तीव्र भावना पाहायला मिळाल्या . सगळ्यांच्या घरात कापूस आहे, मात्र मार्केट नाही, आयात सुरू आहे . सोयाबीन, कांद्याची स्थितीही अशीच आहे . राज्यसरकारने उत्पादन वाढीला प्रोत्साहन देण्याची नीती घ्यायला हवी . ती न घेता दुर्दैवाने या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जातेय . केंद्र आणि राज्य सरकारने याबाबत पावले टाकण्याची आवश्यकता असतानाही ते टाकत नाहीत . याचे परिणाम येणाऱ्या निवडणुकांमध्ये दिसतील असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले .




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


## स्वामी कृपा

त्या आनंदातच ती घरी आली. संध्याकाळी नितीन घरी आल्यावर तिने त्याला सगळी हकीगत सांगितली. नितीन म्हणाला, ' स्वामीकृपेने आपल्याला काम मिळाले आहे ही खूप चांगली गोष्ट आहे. आता आपण जेवणाच्या आधीच घरी स्वामींना नैवेद्य दाखवू. आणि मग जेवण करू या. तिलाही हा विचार आवडला. दोघांनीही शुचिर्भूत होऊन स्वामींना लाडवाचा नैवेद्य दाखवण्यासाठी डबा उघडला आणि काय आश्चर्य..! रेश्माने एका लाडवाला खोचलेला बदाम नाहीसा झालेला होता, त्या लाडवाचा एक घास कोणीतरी खाल्लेला दिसत होता. घरात तर कोणीच नव्हते. मग रेश्माच्या लक्षात आले की रंजनाताईंकडे ज्या आजी मेथीचे आणि डिंकाचे लाडू घेऊन आल्या होत्या, त्या दुसऱ्या तिसऱ्या कोणी नसून त्यांच्या रूपाने स्वामी माऊलीच त्या ठिकाणी आली होती. रेश्माचा राहिलेला नैवेद्य स्वामींनी अशा तऱ्हेने स्वीकारला होता. रेश्माचे डोळे आता भरून आले होते. स्वामींचे आभार कसे मानू असे तिला झाले. आपली श्रद्धा मनापासून असली तर ती स्वामींपर्यंत पोहोचतेच याचा साक्षात्कार तिला झाला होता. भक्तांच्या पाठीशी स्वामी माउली उभी असतेच. तिला फक्त शुद्ध भक्ती हवी असते. मानवसेवा हिच ईश्वरसेवा असते हाही संदेश माउलींनी या घटनेतून दिला होता. रेश्माला स्वामींचे वचन आठवले.

अनन्यश्चिन्तयतो मां ये जनः पर्युपासते !
तेषां नित्यभियुक्तांना योगक्षेमं वहाम्यहं !!

मला अनन्य भावाने शरण येऊन जो माझी भक्ती करतो, त्याचा योगक्षेम मी चालवितो.





## आनंदी पहाट

## सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार

आधुनिक केसरी

आपल्या स्वप्नातल्या व्यक्तिमत्वाचं वेगळेपण अनुभवताना आणि त्यासाठी जीवनशैली निवडताना आपल्या आशा, अपेक्षा, इच्छा. ईर्षा, उन्नती, संपन्नता यांच्या परिपूर्णतेसाठी प्रत्येक बाबींचा विचार करणं आवश्यक असतं. खरं म्हणजे, आपली आणि आपल्या कुटुंबाची खरी ओळख आपआपल्या व्यक्तिमत्वावरूनच होत असते. आपली सजगता, सतर्कता आणि सौंदर्यदृष्टी यांचा मिलाफ आपण आपल्या जीवनात घडवून आणू शकतो. मनात घर करून राहिलेल्या आपल्या प्रतिमेला आपल्या मनाइतकंच सुंदर सजवायचं, खुलवायचं असतं. प्रतिमा छोटी असली तरीही चालेल पण त्याला सजवणारं मन मात्र मोठं असावं लागतं. आपल्या छोट्या प्रतीमेतूनच मोठ्या मनानं सौंदर्याचा साक्षात्कार घडवायचा असतो. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या मानसिकतेशी निगडीत असतो. आपापली अपेक्षा, गरज, उपजत कलागुण, छंद, आवड, निवड, सवड, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण या सर्व बाबींवर आपलं बाहय तसेच अंतर्गत व्यक्तिमत्व कसं असू शकेल, हे ठरतं. आपल्या राहणीमानात एकप्रकारे आपलं व्यक्तिमत्व ऐट अणू शकतं. कल्पक आणि सौंदर्यपूर्ण सकारात्मक विचार, आचार आणि व्यवहार करणारं मन निश्चितच आपल्या जीवनात सौंदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकतं. त्यासाठी सकारात्मक विचार, वर्तन आणि व्यवहार करण्याची नितांत गरज असते. नकारात्मकतेच प्रादुर्भाव होण्याची हीच तीन माध्यमे असतात, आपले विचार, वर्तन आणि व्यवहार. आपल्या जीवनात आपण मानसिक स्वास्थ्यविषयक समस्यांचा सामना करत असलो, तर आपली विचारसरणी, अंतर्मनाची भावना आणि वागणूक या सर्वांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. मानसिक स्वास्थ्यासाठी समस्या निर्माण करणारे नकारात्मक विचारांपासून आपण शक्य तितकं दूर राहणे पसंत करावं. सकारात्मक विचारांच्या माध्यमातून आपण निश्चितच चांगलं परिवर्तन घडवून आणू शकतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**जन्माचाच वीट | दूर झाले ||**
कैवल्याचा स्वामी | विटेवरी उभा ||
चैतन्यास मुभा | पंढरीत ||१||
चंद्रभागा दावी | भक्तीचा सोहळा ||
नामाचा उमाळा | पायरीत ||२||
ज्ञानेशाची ओवी | नाथासंगे बोले ||
अभंगात डोले | तुका माझा ||३||
जनाई संगती | मुक्ताईची गाणी ||
आले डेळा पाणी | ताटी मध्ये ||४||
चोखा गोरा सारे | सावताचा मळा ||
भक्तांचा उमाळा | विठु पाहे ||५||
आनंदले मन | होता संत भेट ||
जन्माचाच वीट | दूर झाला ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


**फार देण्या-घेण्याचा विचार करू नकोस. केलासच तर देण्याचा विचार कर. तू जे देण्याचा विचार करत आहेस ते तुला नक्की मिळेल.**

**चांगल्या विचारांची आवृत्ती कर. प्रत्यक्ष कार्य एकदम जमत नसेल तर वाचन, श्रवण, लेखन, भाषण, स्मरण आदि मार्गाने ही आवृत्ती कर.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**अव्याकृत मन रञ्जनी, जा वश जीव जहान ।**
**मोह पाश छूटे नहीं, महिमा तासु महान**
**।।२४।। (स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/२४**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
माया आपलं स्वरूप दाखवून मनाला प्रसन्न करते. मायेच्या या विषयांमध्ये विश्वातील समस्त जीव वशीभूत आहेत. त्या विषयांचा मोह आणि आसक्ती सुटत नाही. हीच या विश्व-मोहिनी मायेची महान महिमा आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी



परमार्थात साधनेला फार महत्व आहे साधना चांगली होऊ लागली की प्रचीति येऊ लागते आणि मग साधनेकडे थोडे दुर्लक्ष होते. पण ही गोष्ट चांगली नाही. त्यामुळे प्रगती खुंटते. पण साधना परिपक्व होऊन स्वरूपसाक्षात्कार झाला म्हणजे साधना करायचा कंटाळा केला जातो हे फार नुकसान कारक ठरते. चिकाटीने व सातत्याने ऊत्तम साधना झाल्याशिवाय जर ब्रम्हाकारता प्राप्त झाली तर देहाचे ममत्व चिकटण्याचा संभव असतो. तसेच मी पूर्ण ब्रम्हज्ञानी आहे हा गर्व येतो व आळस वाढतो. परमार्थाच्या नावाखाली स्वार्थाची बाजारपेठ वसवली जाते ध्यानाच्या नावाखाली झोप लागते. आणि सर्वात वाईट अवस्था म्हणजे मुक्तपणाच्या नावाखाली स्वैराचार अंगी बोकाळतो. सतत दुसऱ्याची निंदा करण्याकडे मन धावते. सुसंवादाच्या नावाखाली वादविवाद करण्याची मनाची अवस्था होते. आणि अभिमान व तोरा वाढतो. कल्पात आला की महाप्रलय होतो. जिकडे तिकडे पाणीच पाणी होते. आत्मा पण सगळी कडे भरलेला आहे अशा वेळी मी सैरावैरा पळू की कोठे जाऊ काय करू अशी मनाची अवस्था होते. समजा एखाद्या अल्पबुद्धिच्या माणसाने स्वतः च्या हातामध्ये असलेले हत्यार स्वतः वरचं चालवले तर आपल्या हातानेचं आपला घात होतो. म्हणून उपायाचा अपाय कधीही करू नये. म्हणून माणसाने साधना कधीही सोडू नये.
दशक सातवा समास सातवा समाप्त.
श्रीराम जय राम जय जय राम।।
जय जय रघुवीर समर्थ।।

**(दि. 24 च्या अंकात बध्दमुक्तनिरुपण च्या ऐवजी श्रवणनिरुपण असे वाचावे.)**




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## || नामाने सद्बुद्धी उत्पन्न होते ||

आधुनिक केसरी

कौरवांनी पांडवांना निदान पाच गावे तरी द्यावीत, म्हणजे युद्धाचा प्रसंग टळेल, म्हणून भगवान् श्रीकृष्ण स्वतः दुर्योधनाकडे शिष्टाई करण्याकरिता गेले. त्यावेळी दुर्योधनाने सांगितले की, 'देवा, तू म्हणतोस ते सर्व बरोबर आहे. न्यायाच्या दृष्टीने तू म्हणतोस तसे काहीतरी करणे जरूर आहे. पण तसे करण्याची मला बुद्धीच होत नाही, त्याला मी काय करू ? तू सर्वसत्ताधीश आहेस, तर मग माझी बुद्धीच पालट म्हणजे सर्वच प्रश्न एकदम मिटेल !' परंतु तसे काही न होता पुढे युद्ध झाले हे प्रसिद्धच आहे. तीच स्थिती रावणाच्या बाबतीतही दिसते. म्हणून, सगुणरूपी अवताराने वासना किंवा बुद्धी पालटण्याचे कार्य होऊ शकत नाही असे दिसते. सद्बुद्धी उत्पन्न करण्याचे सामर्थ्य फक्त भगवंताच्या नामातच आहे. म्हणूनच त्रिकालाबाधित असणाऱ्या नामावताराची आता जरुरी आहे. नाम म्हणजे भगवंतच आहे. ते नाम अनन्य होऊन आपण घेऊ या. एका माणसाची प्रकृती बरी होती पण त्याच्या पायामध्ये काहीतरी दोष उत्पन्न झाला. डॉक्टर म्हणाला की, "जीव वाचवायचा असेल, बाकीचे सर्व शरीर टिकवायचे असेल, तर पाय कापायला हवा." आता, नुसता प्राण आहे पण हात हलत नाही, पाय हलत नाही, डोळ्यांनी दिसत नाही, कानांनी ऐकू येत नाही, पण प्राण आहे, तर उपयोग नाही. याउलट, बाकी सगळे आहे पण प्राण नाही, तरीही उपयोग नाही. प्राण आहे पण बाकीच्या गोष्टींपैकी एखादी नसली तर चालू शकेल. समजा, कानाने ऐकू येत नाही; नाही तर नाही ! कुठे बिघडले ? उपासना, अनुसंधान, हे प्राणासारखे समजावे; बाकी व्याप आहे तो शरीराच्या इंद्रियांप्रमाणे समजावा. यात भगवंताचे अनुसंधान चुकले तर प्राणच गमावल्यासारखे आहे; ते सांभाळून जे करता येईल तेवढेच करणे जरूर आहे. ते न सांभाळता बाकीच्या गोष्टी केल्या तर अंती निराशा आहे. आमच्या मनासारख्या गोष्टी होत नाहीत म्हणून आम्ही दुःखी आहोत असे म्हणण्यापेक्षा, ती गोष्ट आमच्या मनात आहे हेच दुःखमूळ आहे. अमकी गोष्ट सुखदायक आहे ही जी कल्पना आहे, तीच दुःखमूळ आहे, हे समजून आपण वागले पाहिजे. मांजर उंदराशी खेळते; ते त्याला धरील, परत सोडील, पुनः धरील, पुनः सोडील, पण शेवटी प्राण घेईलच त्याचा. तसे काळ आपल्याशी करतो आहे; आशेत गुंतवून ठेवील, पुढे जाईल. आपण पहिल्यापासूनच हे ओळखून राहावे की असे गुंतून राहण्यात काही फायदा नाही, आणि अनुसंधान ठेवले तरच मनुष्याचे कल्याण होईल. नाही तर फार कठीण आहे. मी-मी म्हणणारे, दुसऱ्याला ज्ञान सांगणारे, विद्वान्, शास्त्री, पंडित सर्व खरे भ्रमातच आहेत. म्हणून म्हणतो, एक करा - अनुसंधान टिकवून जेवढे करता येईल तेवढेच करा. आजचे बोधवचन आहे - आपल्या इच्छेनुसार गोष्टी घडत नाहीत ही भगवंताची कृपाच आहे.



आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २५ फेब्रुवारी २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188
कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९



चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल
४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य
तात्काळ बँकिंग सुविधा
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू
कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा

# लखमापूरला केमिकल कंपनीस ग्रामस्थांचा विरोध

## उपोषणाचा इशारा : विशेष ग्रामसभा घेऊन निर्णय घ्यावा

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुक्यातील लखमापूर ग्रामपंचायत हद्दीमध्ये गावाच्या पुर्वेस गट नंबर 236 मध्ये केमिल उद्योग व इतर उद्योगास ना हरकत देवू नये, तसेच त्यासंदर्भात निर्णय घ्यायचा असेल तर विशेष ग्रामसभा घेऊन गावाला विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा, याबाबत प्रांत अधिकारी व ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे मागणी करुनही गावाला पाणी पुरवठा होत असलेल्या विहीरीजवळ केमिकल युक्त उद्योगाला परवानगी दिलीच कोणी ? असा सवाल उपस्थित करुन त्या विरोधात बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ता ज्योती वि. देशमुख यांनी दिला आहे.

ग्रामपंचायत लखमापुर हद्दीमध्ये गट क्र. 236 च्या एकूण 12 हेक्टर क्षेत्रामध्ये कारखाना केमिकल प्रकल्प, जलप्रदुषण, ध्वनी प्रदुषण, वायु प्रदुषण होणारा प्रकल्प प्रस्तावित असल्याने प्रांत अधिकारी व लखमापूर ग्रामपंचायतीकडे ना हरकत प्रमामणपत्र न देण्याबाबत गावच्या वतीने निवेदन दिले आहे. पूर्वी गावचे महसुली हद्दीत जे प्रकल्प आले आहे त्यापासून मोठया प्रमाणामध्ये गावाला सर्व प्रकारच्या प्रदुषणला सामोरे जावे लागत आहे. अस्तित्वात असलेल्या प्रकल्पापासून होणाऱ्या प्रदुषणामुळे गावातील लोक विविध प्रकारच्या आजारांना बळी पडत आहे. प्रस्तावित कारखान्याचे उत्पादन सुरु झाल्यावर त्यावर उत्पादित माल तयार करुन त्यातुन बाहेर पडणारे रासायनिक मिश्रीत पाणी गट क्र. 236 च्या 12 हेक्टर क्षेत्रामध्ये खोलवर जिरेल. लखमापुर गावाला ज्या फळ विहीरीतून सार्वजनिक पाणी पुरवठा केला जातो. त्याचे लगतच गट क्र. 236 व विहीरीचा परिसर हया दोघांचे मिळून जमिनीचा संयुक्त असा बांध आहे. कारखान्यामधून प्रक्रिया करुन उरलेले खराब रासायनिक मिश्रीत पाणी जमिनीमध्ये जिरल्यामुळे ते पाणी गावाचे सार्वजनिक विहीरीत उतरुन ते पाणी दुषित होऊन गावातील नागरिकांना प्यावे लागेल. सदरचे पाणी भविष्यामध्ये दुषित झाल्यास गावाला पिण्यायोग्य पाण्याचा दुसरा स्त्रोत नाही. लखमापूर गावातील गट क्र.236 क्षेत्रालगत जमिनी लगतच्या बाजूने अनेक शेतकऱ्यांच्या विहीरी आहेत. त्या विहीरींना देखील हेच कारखान्यातून निघणारे दुषित पाणी उतरेल व पिण्याचे पाणी पिण्या योग्य राहणार नाही.

गोरगरीब शेतकऱ्यांच्या विहीरींचे पाणी दुषित झाल्यास शेती पीके घेणे मुश्किल होईल व शेतकरी देशोधडीस लागेल. शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक होऊन त्यांच्यावर आत्महत्येची वेळ येईल, यामुळे ग्रामपंचायतीला दि. 7 जून 2022 रोजी तर दिंडोरीचे उपविभागीय अधिकाऱ्यांना दि. 1 ऑगस्ट 2022 रोजी निवेदन देवून हरकत घेतली असतांना सदरील कंपनीचे काम झपाट्याने सुरु झाले आहे. काम पूर्ण झाल्यावर प्रक्रियाही सुरु होईल. त्यामुळे निष्पाप लोकांना त्रास होणार असल्याने त्याविरुध्द जनआंदोलन उभे करणार असल्याचे मत सामाजिक कार्यकर्त्या ज्योती वि. देशमुख यांनी व्यक्त केले आहे. हरकत घेतली असताना गावाला विश्वासात न घेता महसूल व ग्रामपंचायत विभागाने बांधकाम परवानगी कोणत्या नियमाखाली दिली ? गावातील सर्व सामान्य नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न असतांना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करुन निष्पाप नागरिकांच्या जीवीताशी खेळण्याचा हा प्रकार आहे. गावच्या नागरिकांचा जीव धोक्यात घालून हा कोणता विकास ग्रामपंचायतीकडून चालला आहे ? असा सवाल उपस्थित करुन त्या कामाला त्वरीत स्थगिती द्यावी, अन्यथा लवकरच मोठ्या प्रमाणात ग्रामस्थांना सोबत घेऊन बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा ज्योती वि. देशमुख यांनी दिला आहे.

### हे आहे मुख्य कारण

गट क्र . 236 या जमिनीचा उतार हा गावचे सार्वजनिक पाणी पुरवठा विहीरीचे जवळील नाल्याकडे आहे . हा नाला प्रस्तावित कमिकल कंपनीच्या लगत आहे . सदर नाला हा विविध प्रकारच्या शेतजमिनी ओलांडून कादवा नदी पात्राला जाऊन मिळतो . नदीमध्ये दुषित पाणी जाणार आहे . गावची सार्वजनिक पाणी पुरवठा विहीरीजवळील नाल्यामधून ज्या – ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीमार्गे प्रस्तावित कारखान्याचे दुषित पाणी जाणार आहे त्या शेतकर्यांच्या बोअरवेल व विहीरींना पाणी पाझरून ते विहीरींना मिळेल व त्यानंतर गावाचे दक्षिण बाजूला कादवा नदीमध्ये पाणी जाईल .

## त्या कंपनीच्या परवानगीची चौकशी करणार : निलेश अपार दिंडोरी प्रांत

लखमापूर येथे ग्रामपंचायत हद्दीमध्ये गावाच्या पुर्वेस गट नंबर 236 मध्ये गावाला पाणी पुरवठा होत असलेल्या सार्वजनिक विहीरीजवळील केमिकल युक्त कंपनीला ग्रामस्थांचा विरोध असतांना परवानगी दिली गेली . ती परवानगी रद्द करावी, अन्यथा उपोषण करण्याचा इशारा लखमापूरच्या सामाजिक कार्यकर्त्या ज्योती वि . देशमुख यांनी दिला होता . त्याबाबत सविस्तर वृत्त दैनिक देशदूतने प्रसिध्द करताच दिंडोरीचे उपविभागीय अधिकारी निलेश अपार यांनी दखल घेत त्या कंपनीला परवानगी कोणत्या अनुषंगाने दिली याची चौकशी करुन प्रदुषण महामंडळाकडे पत्र व्यवहार करण्यांत येणार असल्याचे आश्वासन उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले . केमिकल उद्योग व इतर उद्योगास ना हरकत देवू नये, तसेच त्यासंदर्भात निर्णय घ्यायचा असेल तर विशेष ग्रामसभा घेऊन गावाला विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा, याबाबत प्रांत अधिकारी व ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती . यावर लखमापूर ग्रामपंचायतीने मासिक ठराव तसेच ग्रामसभेचे ठराव करत या कंपनीस विरोध केला होता . परवानगी देण्याअगोदर त्या कंपनीचा उद्देश आणि त्याची प्रक्रिया याबाबत सविस्तर माहिती ग्रामसभेला दिले . विशेष ग्रामसभा बोलावून ग्रामस्थांना विश्वासात घेऊन त्या कंपनीला परवानगी द्यावी असा ठराव झालेला असतांना तरी देखील या कंपनीला कोणत्या आधारे परवानगी देण्यात आली असा सवाल उपस्थित केला जात आहे .

यावर ज्योती देशमुख उपविभागीय अधिकार्यांची भेट घेत त्यांना सविस्तर माहिती दिली . त्यावर तत्काळ त्या प्रकरणाची चौकशी करुन प्रदुषण महामंडळाकडे पत्र व्यवहार करुन गावाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिंडोरीचे उपविभागीय अधिकारी निलेश अपार यांनी दिले . ग्रामसभा, मासिक सभेमध्ये विरोध करुनही कंपनीला परवानगी कशी दिली जाते ? याची चौकशी उपविभागीय अधिकाऱ्यांनी लावली तरी त्यातून ग्रामस्थांना न्याय मिळेल की नाही ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे .

# मोलखेडा येथे सोलर पेचिंग गार्ड चोरट्यांनी पळविला

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा गेल्या अनेक दिवसांपासून विद्युत मोटारची बऱ्याच चोरी झालेल्या आहेत त्यात पुन्हा दि.२२/२/२३ रोजी शेतकरी गोपाळ नारायण पाटील गट नंबर ८३ मधून सोलर पेचिंग गार्ड चोरीला गेला आहे. शेतकरी गोपाळ पाटील सकाळी शेतात गेले असता सोलार पॅनल चोरी झाल्याचे दिसून आले की सौर ऊर्जा पंप व विद्युत मोटार चोरणाऱ्या टोळीने लांबविला. आतापर्यंत मोलखेडा व हिवरी शिवारात बऱ्याच पंधरा ते वीस विद्युत मोटारची चोरट्यांनी चोरी केलेल्या आहेत चोरीची तक्रार शुद्धा फर्दापूर पोलिस ठाण्यात व सावळदबारा चौकीत दाखल करण्यात आलेल्या आहेत परंतु आतापर्यंत एकही विद्दूत पंपाचा तपास पोलिसांनी लावलेला नाही यामुळे या परिसरात चोरट्यांची चांगलीच दहशत निर्माण झाली आहे.

चोरट्यांनी मोलखेडा,हिवरी शिवारात अनेक दिवसांपासून धुमाकूळ घातला आहे. याबाबत विद्युत मोटारची शेतकऱ्यांनी सौर ऊर्जा पंप चोरीला गेल्याच्या अनेक तक्रारी सावळदबारा पोलिस चौकीला दिल्या आहेत.त्यानंतर आज पहाटे सौर ऊर्जा पंप चोरणारी टोळीने मोलखेडा शिवारात शेतकरी गोपाळ पाटील यांचे सौर उर्जाची ६० एम.पीआरची बट्रिक,१०० व्होल्ट सोलर प्लॉन,१६ व्होल्टेजचे करंट मशीन चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास सौर ऊर्जा प्लॉन अंधाराचा फायदा घेऊन चोरुन नेला.सदर घटनेमुळे मोलखेडा शिवारात शेतकऱ्यांमधे भिंतीचे वातावरण तयार झाले आहे याबाबत शेतकरी गोपाळ नारायण पाटील यांनी अज्ञात चोरट्यां विषयी फर्दापूर पोलिस ठाण्यात व सावळदबारा पोलिस चौकीत बिट जमादार मिरखॉा तडवी यांच्या कडे गुन्हा दाखल करण्यात आली आहे.अशी माहिती शेतकरी ज्ञानेश्वर पाटील, संदीप शिवाजी पाटील यांनी बोलताना सांगितले.

# ऊस वाहतूकदारांची फसवणूक केलेल्या ऊस टोळी मुकादमावर गुन्हा नोंद होणार

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** येथील वाहन मालकास ऊस तोडणी कामगार देतो असे सांगून टोळी न देता त्यांच्याकडून रु.6 लाख घेवून फसवणुक केल्याप्रकरणी टोळी मुकादमा विरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. याबाबत सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांनी पाठपुरावा केला होता. पंढरपूर तालुक्यातील खेडभाळवणी येथील शेतकरी बाबासाहेब महादेव करपे-देशमुख यांनी सहकार शिरोमणी साखर कारखान्याकडे ऊस तोडणी वाहतुकीसाठी गळीत हंगाम 2022-2023 मध्ये रितसर करार केलेला होता. त्या अनुषंगाने श्री.देशमुख यांनी टोळी मुकादम करमसिंग मोग्या वसावे रा.ओलपाडा,ता. अक्कलकोवा जि.नंदुरबार यांना 24 कामगार पुरविण्यासाठी रक्कम रु.6 लाख उचल दिलेली होती. कारखाना गळीत हंगाम सुरु झाला परंतू टोळी का आली नाही अशी वारंवार मुकादम यांना विचारणा केली असता टोलवा टोलवीची उत्तरे देवू लागला. मात्र गळीत हंगाम संपत आला तरी कामगारांचा पुरवठा केला नाही. त्यामुळे शेतकरी बाबासाहेब



महादेव करपे यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान झालेले असून त्यांची टोळी मुकादम यांचेकडून फसवणुक झालेली आहे. आशा फसवणुक करणारे टोळी मुकादम योग्य ती कायदेशिर कारवाई करावी. तसेच ज्या वाहन मालकाची टोळी न आल्यामुळे फसवणुक झालेली आहे. अशा वाहन मालकांनी कारखान्याचे शेती विभागाकडे आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करणेत यावी. जेणेकरुन संबंधित टोळी मुकादमावर योग्य ती कायदेशिर कारवाई करणे सोईचे होईल. त्याकरीता कायदेशिर कारवाई करणेकामी योग्य ते सहकार्य कारखान्यामार्फत करण्यात येणार असल्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांनी सांगीतले.

राज्यातील साखर कारखान्याचा गळीत हंगाम 2022-2023 मध्ये मोठ्या प्रमाणावर ऊसाचे गाळप सुरु आहे. मात्र गाळप हंगामात बऱ्याच वाहतुकदारांच्या टोळ्या हजर झालेल्या नाहीत. ऊस वाहतुकदारांकडून लाखों रुपयांचे उचल ऊस टोळी मुकादमांनी घेतलेली आहे. मात्र ॲडव्हान्स् घेवुनही टोळी कामावर हजर न केल्यामुळे अनेक वाहनमालकांची फसवणुक झाली असून टोळी मुकादम यांचेवर फसवणुकीचा गुन्हा नोंद करुन शेतकऱ्यांना न्याय मिळावा आशा आशयाचे निवेदन सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांनी पोलिस निरिक्षक धनंजय जाधव यांचेकडे दिले.

# नारायण मूर्ती यांचे आवाहन

आधुनिक केसरी

इन्फोसिसचे सह-संस्थापक एन.आर. नारायण मूर्ती यांनी भारतीय व्यावसायिक पद्धतीवर चिंता व्यक्त केली आहे त्यांनी म्हटले आहे की, भारताला समृद्ध होण्यासाठी प्रामाणिक संस्कृतीची गरज ज्यामध्ये पक्षपाताला जागा नसावी. त्यांनी सांगितले की, भारताला समृद्ध होण्यासाठी जलद निर्णय घेण्याची, जलद अंमलबजावणी, त्रासमुक्त सोपे व्यवहार, व्यवहारात प्रामाणिकपणा आणि पक्षपात न करण्याची संस्कृती निर्माण करण्याची गरज आहे. परराष्ट्र मंत्रालयाने पुणे येथे आयोजित आशिया इकॉनॉमिक डायलॉग या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. यामध्ये मूर्ती यांनी हजेरी लावली. त्यांनी म्हटले की, देशातील केवळ एक छोटासा वर्ग कठोर परिश्रम करतो. पंतप्रधानांच्या इच्छा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेली संस्कृती अद्यापही बहुतेक लोकांनी आत्मसात केलेली नाही. मूर्ती यांनी भारतातील सध्याच्या व्यावसायिक वातावरणावर भाष्य केले आहे. मूर्ती यांनी म्हटले की, 'भारताला एक देश म्हणून समृद्ध होण्यासाठी प्रामाणिकपणाची संस्कृती आवश्यक आहे. त्यांनी पुढे सांगितले की, 'भारतात अशी संस्कृती असली पाहिजे जिथे कोणताही पक्षपात न करता झटपट निर्णय घेतले जातील. तसेच व्यवहार प्रामाणिकपणे आणि सहजतेने पूर्ण करता येतील. आपल्याला जलद निर्णय घेण्याची, जलद अंमलबजावणी, त्रासमुक्त व्यवहार, व्यवहारात प्रामाणिकपणा आणि पक्षपात न करण्याची संस्कृती निर्माण करण्याची गरज आहे, असे नारायण मूर्ती यांनी म्हटले. त्यांनी सांगितले की, 1940 च्या शेवटी भारत आणि चीन या दोन्ही देशांचा व्यावसायिक आकार समान होता, पण आता चीनचे व्यावसायिक आकारमान भारताच्या आकारमानाच्या सहा पटीने वाढले आहे, कारण त्यांनी ही संस्कृती आत्मसात केली आहे. मूर्ती यांनी म्हटले की, भारतीय उद्योगपतींनी भारतातच राहून उद्योग करायचे शक्य झाल्यास फार आनंद होईल. भारतात चांगल्या कंपन्यांची कमतरता आहे. यूनीकॉर्न्स कंपन्या म्हणजेच एक अब्ज डॉलरची उलाढाल असणाऱ्या कंपन्याची कमी आहे. यामुळे खूप नुकसान होते. मूर्ती यांनी सांगितले की, 'आम्हा भारतीय उद्योगपतींनी फक्त भारतातच राहायचे असेल आणि भारतातच सर्व काही करायचे असेल तर तसे करण्यात आम्हाला खूप आनंद होईल. यासाठी सरकारने निर्णय त्वरित घेतले जावे आणि त्यांची लवकरात लवकर अंमलबजावणी व्हावी, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

# लोकसंस्कृतीचे लोकनायक : प्रा. डॉ. प्रकाश खांडगे


आधुनिक केसरी



बाळासाहेब जोगदंड
संपर्क क्र. 9423051246

**महाराष्ट्रातील लोकसाहित्याचे लोककलांचे अभ्यासक प्रा. डॉ. प्रकाश खांडगे यांनी लोकसाहित्य आणि लोककलांना सैद्धांतिक बैठक प्राप्त करून दिली. त्यांच्या लोककला क्षेत्रातील ज्ञानाचा आणि व्यासंगाचा फायदा राज्यातील सामाजिक दृष्ट्या तसेच आर्थिक दृष्ट्या दुर्लक्षित असलेल्या लोककलांना झाला. असे लोकसंस्कृतीचे लोकनायक प्रा. डॉ. प्रकाश खांडगे आज वयाच्या 67 व्या वर्षात पदार्पण करीत आहेत त्या निमित्ताने...**

प्रा. डॉ. प्रकाश खांडगे लोकसंस्कृती, लोककला आणि त्यात दडलेल्या व्यासंगासाठी अहोरात्र कार्य करत राहणारे एक आगळे वेगळे व्यक्तिमत्व आहे. अपेक्षित लोककलांना, लोककलावंतांना एक जागरूक पत्रकार, लोकसाहित्य आणि लोककलचे अभ्यासक म्हणून न्याय देण्यासाठी ते सतत कार्यरत राहिले आहेत. शासनाच्या लोककलांच्या संदर्भातील अनेक पथदर्शी विकास योजनांमध्ये आपले महत्त्वाचे योगदान त्यांनी दिलेले आहे. डॉ. खांडगे यांनी सन 2004 मध्ये मुंबई विद्यापीठात लोककला अकादमीची मुहूर्तमेढ रोवली. फेब्रुवारी 2017 मध्ये ते मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीतून प्राध्यापक म्हणून निवृत्त झाले. लोककलेचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देणारे मुंबई विद्यापीठ हे भारतातील बहुदा एकमेव विद्यापीठ असावे यासाठी डॉ. खांडगे यांचे प्रयत्न विसरता येत नाहीत. लोककला अकादमीत पीएचडी संशोधन सुरू करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत त्यांच्या सहा विद्यार्थ्यांनी पीएचडी पदवी संपादन करून नावलौकिक मिळवला. लोकसाहित्य, लोककलांचे संशोधनकामी त्यांचे योगदान अलौकिक राहिले आहे. त्यांनी या विषयी महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, लोकमत, नवशक्ती, पुण्यनगरी, सकाळ, सामना आदी वृत्तपत्रात लेखन केले. या संशोधन लेखांची संख्या पाचशेच्या वर झाली ही अभिनंदनीय बाब ठरते. त्यांनी अनेक आघाडीच्या दैनिकात उपसंपादक ,पुरवणी संपादक, वार्ताहर अशा महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडत लोकसंस्कृतीची नाळ कायम जोडून ठेवण्यात ते यशस्वी झाले.
1978 साली डॉ. खांडगे यांनी इंडियन नॅशनल थिएटर संशोधन केंद्रात जेष्ठ नाटककार गीतकार अशोकजी परांजपे यांच्या मार्गदर्शनाखाली लोककलेतील संशोधनाचे कार्य सुरू केले. 1979 झाली रंगभूमीवर आलेले 'खंडोबाचे लगीन' या संशोधन नाटकाचे संशोधन डॉ. खांडगे यांनी करत रंगभूमीवर आपली एक वेगळी प्रतिमा निर्माण केली. लोकसाहित्याच्या ज्येष्ठ विदुषी डॉ. दुर्गा भागवत, डॉ. चिंतामण ढेरे, डॉ. प्रभाकर मांडे अशा गुरूंचे यशस्वी मार्गदर्शन त्यांना मिळाले. खंडोबाचे जागरण या विधी नाट्यावर मुंबई विद्यापीठात पीएचडी चे काम करीत त्यांनी 'जागरण : विधीनाट्य इतिहास वाङ्मय प्रयोग' या विषयावर पीएचडी पदवी मिळवली. डॉ. खांडगे यांनी आतापर्यंत जागरण , गोंधळ, तमाशा बहुरूपी, रायदंर बोहाडा , कीर्तन, भारुड, लळीत आदी



विषयांवर संशोधन करीत लेखन केले. तर पद्मविभूषण तिजनबाई, तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर, पद्मश्री यमुनाबाई वाईकर, पद्मश्री शाहीर साबळे, लोकशाहीर विठ्ठल उमप, लोकसाहित्याचे गाढे संशोधक रामचंद्र ढेरे आदी मान्यवरांवर विस्तृत लेखन करून त्यांच्या प्रती आदरभाव प्रकट केला. शिवाय वगसम्राट दादू इंदुरीकर, विठाबाई नारायणगावकर, वारी नृत्यकार राजूबाबा शेख अशा अनेक कलावंतांना डॉ. खांडगे यांनी न्याय मिळवून दिला हे विसरता येत नाही. अत्यंत मितभाषी, कार्यासाठी सदैव तत्पर आणि विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेल्या खांडगे यांनी महाराष्ट्र शासनाचा लावणी महोत्सव, ढोलकी फडाचा तमाशा महोत्सव, संगीतबारी ,ढोलकी फड, शाहिरी, दशावतार ,खडी गंमत अशा लोककलांना महाराष्ट्र शासनातर्फे आर्थिक मदतीचे पॅकेज मिळवून देण्यात डॉ. खांडगे यांचा मोलाचा सहभाग राहिला. शासनातर्फ आयोजित होणाऱ्या अनेक तमाशा शिबिराचे संचालक पद त्यांनी सांभाळले. साहित्य आणि शिक्षण क्षेत्र यांची लोकसाहित्य, लोककलांशी सांगड घालण्याचे आणि त्याचबरोबर या क्षेत्रांना सामाजिक योगदान आणि प्रतिष्ठा देण्याचे महत्त कार्य डॉ. खांडगे यांनी केले. चाळ माझ्या पायात, खंडोबाचे जागरण, भंडार भुका, नोहे ऐकल्याचा खेळ, महाराष्ट्राच्या प्रयोगात्मक लोककला, इत्यादी अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहून लोकसाहित्यात मोलाची भर घातली. हे संशोधन कार्यासाठी आधार ठरले. तर गर्जा महाराष्ट्र माझा, लोकलेणी, लोकपरिक्रमा या मुंबई विद्यापीठाने संपादित केलेल्या ग्रंथात त्यांचे योगदान दिसून येते. त्यांना भारताचे तत्कालीन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते 6 फेब्रुवारी 2019 रोजी संगीत नाटक अकादमी पुरस्कार, ठाणे भूषण पुरस्कार,शिवनेरी भूषण पुरस्कार, महाराष्ट्र शासनाचा कलादान पुरस्कार, पद्मश्री दया पवार पुरस्कार मिळाले. आंतरराष्ट्रीय परिषदांमधून दोन वेळा अमेरिकेत, चार वेळा चीनमध्ये शोधनिबंधाचे भाषण आणि भारताचे नेतृत्व त्यांनी केले. संगीत नाटक अकादमी महापरिषद सदस्य भारत सरकार, आयसीसीआर लोककलावंत पथक निवड समिती सदस्य भारत सरकार, पु.ल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी चेअरमन, लोककलावंत आर्थिक अनुदान समिती सदस्य, विठाबाई नारायणगावकर लोककला जीवन पुरस्कार सदस्य ,महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ समन्वयक म्हणून यशस्वी कार्य डॉ. खांडगे यांनी केलेले दिसते. पर्यावरणाचा संदेश देणारी पंढरीची वारी संकल्पना आणि मार्गदर्शन, कोरोना काळात लोककलावंतांना प्रत्यक्ष आर्थिक मदत, लोककलेचे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी आदी सामाजिक क्षेत्रातील मौलिक कार्याची नोंद घ्यावीच लागते. यावरून डॉ. खांडगे यांचे कार्य दीपस्तंभासारखे वाटते. विशिष्ट ध्येयाप्रती सतत क्रियाशील राहून लोकसाहित्य, लोकसंस्कृतीसाठी झपाटल्यासारखे कार्य त्यांच्या हातून घडते आहे हे गौरवास्पद वाटते. म्हणून त्यांच्या अलौकिक, परिवर्तनवादी आणि लोकसंस्कृतीच्या कार्याचा प्रत्येकास अभिमान वाटतो. आज ते 67 व्या वर्षात पदार्पण करीत आहेत त्यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

**( लेखक प्रसिद्ध साहित्यिक तथा लोककलेचे अभ्यासक आहेत)**

# आनंदी बाई जोशी : विदेशात शिकून पदवी मिळविणारी पहिली भारतीय डॉक्टर

आधुनिक केसरी

**आपला भारत देश पुरुषप्रधान असल्याने प्रत्येकवेळी स्त्रियांना कमी लेखले जात होते. तेव्हाचं सोडा, आजही काही खेड्यापाड्यांत स्त्रियांना महत्त्व दिले जात नाही, परंतु भारतीय स्त्रियांनी प्रत्येकवेळी काहीतरी वेगळे करून सगळ्यांचाच तोरा उतरवला आहे. कित्येक भारतीय स्त्रियांनी विलक्षण असे कार्य करून देशाला नावलौकिक मिळवून दिला आहे. त्याच स्त्रियांपैकी एक म्हणजे – आनंदीबाई गोपाळ जोशी! या आनंदीबाई म्हणजे भारताच्या पहिल्या महिला डॉक्टर होतं. काय? ऐकून आश्चर्य वाटलं ना? हो एक मराठमोळी स्त्री भारताची पहिली महिला डॉक्टर होती. त्यांनी १८८६ मध्ये थेट अमेरिकेमधून डॉक्टरकी मिळवली होती.**

आनंदीबाईंचा जन्म सनातनी ब्राम्हण कुटुंबात झाला. वयाच्या ९ व्या वर्षी त्यांचे गोपाळरावांशी लग्न झाले. गोपाळराव विधुर होते आणि वयाने आनंदीबाईंपेक्षा तिप्पट मोठे होते. आनंदीबाईंचे पती गोपाळराव जोशी हे उदारमतवादी होते. त्यांनी नेहमी आपल्या पत्नीच्या मागे खंबीरपणे उभे राहून तिचा विश्वास वाढवला. त्यांनी नेहमी आनंदीबाईना प्रेरणा देण्याचे काम केले. वयाच्या १४ व्या वर्षी प्रसूतीच्या वेळी वैद्यकीय संसाधने उपलब्ध नसल्याने आनंदीबाईना त्यांच्या पहिल्या मुलाला गमवावे लागले. त्याच क्षणाला त्यांनी डॉक्टर होण्याचे ठरवले. गोपाळरावांनी सुद्धा आपल्या बायकोला शिकवण्याचे ध्येय मनाशी बाळगले आणि तिच्या मागे खंबीरपणे उभे राहून तिचे प्रत्येक पाऊलावर समर्थन केले. त्यावेळी स्त्रियांचे शिक्षण कुणीही गंभीरपणे घेत नसे. परंतु गोपाळराव त्यामधील नव्हते. त्यांनी आनंदीबाईंशी एका अटीवर लग्न केले होते की, मुलीने शिक्षण घेण्यास तयार असावे, तसेच किमान तिने लिहिता वाचता येईल एवढे तरी शिकावे. गोपाळरावांनी आनंदीबाईंना मराठी, इंग्रजी आणि संस्कृत कशी लिहितात आणि वाचतात त्याचे शिक्षण दिले. आनंदीच्या आई–वडिलांनी तिच्या शिक्षणामध्ये हस्तक्षेप करू नये, म्हणून गोपाळरावांनी आपली बदली कोलकत्त्याला करून घेतली. गोपाळराव आनंदीच्या शिक्षणासाठी नेहमी आग्रही असायचे. हळूहळू आनंदीबाईंना देखील शिक्षणाची गोडी लागली. पण या सर्व प्रवासात त्यांनी खूप हालअपेष्टा देखील सोसल्या. १८८० मध्ये गोपाळरावांनी प्रसिद्ध अमेरिकन मिशनरी रॉयल विल्डर यांना पत्र पाठवले. त्या पत्रात त्यांनी आपल्या पत्नीची अमेरिकन औषधांचा अभ्यास करण्याची इच्छा आहे तर तिला काही मदत मिळू शकते का असे ? असे विचारले होते. २६ फेब्रुवारी याच दिवशी आनंदीबाई जोशी यांचे क्षयरोगाने पुणे येथे १८८७ साली वयाच्या केवळ २२ व्या वर्षी निधन झाले आनंदीबाई जोशी यांचा जन्म पुण्यात ३१ मार्च १८६५ रोजी झाला त्यांचे नाव यमुना असे होते. त्यांचे वय केवळ नऊ असताना त्यांच्या पेक्षा २० वर्षे वयाने जास्त असलेल्या गोपाळ राव जोशी यांच्या बरोबर त्यांचा विवाह झाला. गोपाळ




राव जोशी हे अहमद नगर जिल्ह्यातील संगमनेर येथील रहिवाशी होते. त्यांनी लग्नानंतर यमुनेचे नाव आनंदीबाई असे ठेवले. गोपाळराव जोशी हे पोस्टात नोकरी होते.कल्याण , अलिबाग व कलकत्ता येथील पोस्ट ऑफिस मध्ये त्यांनी काम केलेआनंदीबाईंना वयाच्या १४ व्या वर्षी मुलगा झाला . पण वैद्यकीय उपचार न मिळाल्याने केवळ १० दिवसातच त्याचे निधन झाले. या गोष्टींचा विलक्षण परिणाम या जोशी दाम्पत्यावर झाला गोपाळराव जोशी यानी संस्कृत व इंग्लिश या भाषा आनंदीबाईंना कलकत्ता येथे शिकविण्यास सुरवात केली. त्यांनी लोकहितवादींची पत्रे आनंदीबाईंना वाचून दाखवली व शिक्षणाची प्रेरणा दिली. त्यांनी कलकत्ता येथे एका भाषणात भारतातील स्त्रियांना वैद्यकीय शिक्षण कसे जरुरीचे आहे हे पटवून दिले. त्याचा विलक्षण परिणाम भारतीयांवर झाला व आर्थिक मदत दिली त्यावेळच्या व्हाइसरायनी त्यांना २०० रुपयांची मदत दिली होती त्यांनी अमेरिकेत पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी प्रयन्त केले व त्यांना वयाच्या १९ व्या वर्षी म्हणजेच १८८३ साली वूमन कॉलेज ऑफ पेन्सि व्हेनिया अमेरिका येथे प्रवेश घेतला. तेथे दोन वर्षातच त्यांनी एम डी ही वैद्यकीय क्षेत्रातील पदवी मिळविली. हिंदू आर्य लोकांचे प्रसुती शास्त्रातील नैपुण्य या विषयावर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळवली.अमेरिकेत पदवीदान समारंभ झाला या समारंभास गोपाळराव जोशी हे उपस्थित होते. व्हिक्टोरिया राणीनी त्यांचे अभिनंदन केले.अमेरिकेतील पदवी मिळविल्यानंतर त्यांनी भारतात प्रवेश घेतला व कोल्हापूर येथे अल्बर्ट एडवर्ड हॉस्पिटल मध्ये नोकरीस सुरवात केली. पण हे काम त्या फार दिवस करू शकल्या नाहीत त्यांना क्षयरोगाने ग्रासले त्यांची प्राणज्योत २६ फेब्रुवारी १८८७ रोजी पुणे येथे निमाली त्यांच्या अस्थी अमेरिकेत त्या ज्या कार्पेंटर कुटुंबाकडे राहत होत्या तेथे त्यांनी त्यांचे स्मारक उभारले समीर विद्वांस यांनी २०१९ साली त्यांच्यावर आनंदी गोपाळ हा चित्रपट काढला होता तो रसिकांमध्ये प्रचंड लोकप्रिय ठरला त्याला पुणे येथे २०२० साली पुणे आतंरराष्ट्रीय फिल्म महोत्सवात मराठी भाषेतील पारितोषिक सुद्धा मिळाले. आपल्या प्रकृतीची काळजी न घेता भारतीयांसाठी विदेशात शिक्षण घेऊन पहिली महिला डॉक्टर होण्याचा बहुमान आनंदीबाई जोशींनी मिळविला.

**शांताराम वाघ, पुणे**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# बुलढाण्याच्या राजूर घाटात बस पलटी

## ८ प्रवाशी जखमी : चालकाच्या प्रसंगवधानाने मोठा अनर्थ टळला

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** येथून जामनेरकडे प्रवाशी घेवून जाणाऱ्या बसचे राजूर घाटामध्ये ब्रेक निकामी झाले. ही बाब चालकाच्या लक्षात येताच त्यांनी प्रसंगवधान राखल्याने मोठा अनर्थ टळला. मात्र, बस पलटी झाल्याने बसमधील ८ प्रवाशी जखमी झाले. सदर घटना आज गुरुवार २३ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.४५ वाजेच्या सुमारास देवीच्या मंदीरासमोरच्या वळणावर घडली.जामनेर डेपोची एम. एच. ४० एन-९०९७ ही बस चालक लोखंडे बुलढाणा येथून घेऊन निघाले होते, त्यामध्ये २९ प्रवाशी होते. राजूर घाटात देवीच्या मंदीरापूढील वळणार बसचे ब्रेक निकामी झाल्याचे चालक लोखंडे यांच्या लक्षात आले. यावेळी लोखंडे यांनी दरीकडे वळत असलेली बस पहाडाकडे वळविल्याने मोठा अनर्थ टळला. परंतु बस पलटी झाल्याने बसमधील गंगाराम सुखदेव वाघ ( वय ८४ ) सौ. लताबाई गावंडे ( वय ३५ ), अरुण वाघ ( वय ५२ ), इंदुबाई वाघ ( वय ४५ ) सर्व रा. दे. गुजरी ता. जामनेर, श्रीकृष्ण जाधव ( वय ७५ ) रा. नांद्रा हवेली ता. जामनेर, मधूकर जाधव ( वय ७६ ) रा. लोणी ता. जामनेर, शेषमन राठोड ( वय ६६ ) रा. घाणेगाव ता. सोयगाव, अशोक पाटील ( वय ६५ ) रा. मांडवे बु. ता. जामनेर हे प्रवाशी किरकोळ जखमी झाले असून त्यांची तब्येत चांगली आहे.

# पीएच.डी संशोधक विद्यार्थ्यांना त्वरित संशोधन मार्गदर्शक उपलब्ध द्या : किशोर शितोळे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जनसंवाद व वृत्तपत्र विभागात एम.फील



पूर्ण करून पीएचडीचे संशोधन करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद व वृत्तपत्र विद्या विभागातील विद्यार्थ्यांना पीएच. डीसाठी मार्गदर्शक उपलब्ध होत नसल्या कारणाने संशोधक विद्यार्थ्यांचे आर्थिक व शैक्षिणक नुकसान होत असल्याची तक्रार राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे माजी सदस्य किशोर शितोळे यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू,प्र.कुलगुरू,कुलसचिव आदींकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनात शितोळे यांनी असे म्हटले आहे की, जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागातील सारथी,महाजोती,बार्टी,मौलाना आझाद,राजीव गांधी फिलोशिफसाठी एम.फिल पूर्ण केलेल्या संशोधक विद्यार्थ्यांना पीएच.डीसाठी मिळणारी फिलोशिफ सलग करण्यासाठी जनसंवाद व वृत्तपत्रविद्या विभागात मार्गदर्शक उपलब्ध नाहीत. त्यामुळे अनेक संशोधक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत असून मानसिक त्रासांनाही सामोरे जावे लागत आहे.

संशोधक विद्यार्थ्यांनी संबंधित विभागास अनेक वेळा विनंती अर्ज करून देखील प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे.म्हणून विद्यार्थी संशोधन कार्यापासून वंचित राहत आहे.यावर विद्यापीठ प्रशासनाने गांभीर्याने विचार करून पीएच.डी संशोधक विद्यार्थ्यांसाठी त्वरित मार्गदर्शक उपलब्ध करून विद्यार्थ्यांची शैक्षणिक हेळसांड थांबवावी असेही शितोळे यांनी कुलगुरूंना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. संशोधनाच्या दृष्टीने आर्थिक व शैक्षणिक नुकसान होत असल्याने विद्यार्थ्यांमधून नाराजीचा सूर निघत असून तीव्र संतापाची भावना निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

# 'मोक्का' लावलेल्या गुन्हेगाराचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** कर्वे रस्त्यावर सराईत गुन्हेगारावर तीक्ष्ण शस्त्राने वार करुन त्याचा खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. गुन्हेगाराचा खून पूर्ववैमनस्यातून झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. पसार झालेल्या हल्लेखोरांचा पोलिसांकडून शोध घेण्यात येत आहे. नंदू जाधव (वय २२) असे खून झालेल्या सराईताचे नाव आहे. या प्रकरणी हल्लेखोरांच्या विरुद्ध अलंकार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जाधव याच्याविरुद्ध वारजे पोलिसांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (मोक्का) कायद्यान्वये कारवाई केली होती. मोक्का कारवाई झाल्यानंतर त्याने न्यायालयाकडून जामीन मिळवला होता. जामीन मिळवल्यांतर तो नुकताच कारागृहातून बाहेर आला होता. गुरुवारी (२३ फेब्रुवारी) रात्री अकराच्या सुमारास तो कर्वे रस्त्यावरील पीएनजी ज्वेलर्ससमोरुन निघाला होता. हल्लेखोर त्याच्या मागावर होते. रस्ता ओलांडणाऱ्या जाधववर चौघा जणांनी तीक्ष्ण शस्त्राने वार केले.

# मुलीच्या प्रेम प्रकरणातून खून झाल्याची कबुली

## खून प्रकरणातील आरोपी बारा तासांत अटक

आधुनिक केसरी न्यूज

**आकाश सोनवणे**

**धुळे :** अत्यंत क्रूर हत्येचा स्थानिक गुन्हे शाखा व मोहाडी नगर पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी यांनी अवघ्या १२ तासाच्या आत छडा लावून खुनाचा गंभीर गुन्हा उघडकीस आणला आहे. शहरातील मोहाडी नगर पो.स्टे हददीत अवधान शिवारात नितीन विठठल चौधरी यांचे पडीत शेतात एका तरुणाचा निघृण खून करून त्याचा शिर नसलेला मृतदेह मिळून आल्याने खळबळ उडाली होती . ही खबर मिळताच धुळे जिल्हयाचे पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांच्या सह संपूर्ण स्टॉफ तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. यातील मयत सतिष बापू मिस्तरी यांचा निघृण



खुनाचा छडा लावणे बाबत तसेच यातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेवून गुन्हा उघडकीस आणणे बाबत पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी हेमंत पाटील, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखेस व भुषण कोते, सहा . पोलीस निरीक्षक, मोहाडी नगर पो.स्टे यांना आदेश दिले होते. पोलीस अधीक्षक यांचे आदेश व मार्गदर्शना प्रमाणे यातील मृत्यू झालेल्याच्या बाबत संपूर्ण माहिती प्राप्त करून घटनास्थळावर मिळून आलेले पुरावे, गोपनीय माहिती व तांत्रीक विश्लेषणाचे आधारे आरोपीची माहिती- काढून स्थानिक गुन्हे शाखा , धुळे येथील पथकाने गुन्हयातील संशयीत नामे चेतन प्रताप गुजराथी वय -२१ रा दंडेवाले बाबा नगर , मोहाडी उपनगर , धुळे यास औरंगाबाद येथून ताब्यात घेतले तसेच मोहाडी नगर पो.स्टे च्या पथकाने देखील गुन्हयातील दुसरा संशयीत विधीसंघर्षात बालक यास ताब्यात घेतले दोघा संशयीतांना विश्वासात घेवून विचारपूस करता त्यांनी गुन्हयाची कबुली दिली ओ . सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, सह पोलीस अधीक्षक ऋषिकेश रेडडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, सपोनि भुषण कोते, योगेश राऊत,बाळासाहेब सुर्यवंशी, हेमंत राऊत, संजय पाटील, प्रभाकर बैसाणे, श्रीकांत पाटील, योगेश चव्हाण, राहुल सानप, कमलेश सूर्यवंशी, राहुल गिरी, श्रीशैल जाधव, सुनिल पाटील, अमोल जाधव चापोशि . कैलास महाजन तसेच मोहाडी नगर पो. शाम निकम, किरण कोठावदे, बी.एस. माळी, जे. ए. चौधरी , जे.सी. बाघ, एम.एन. मोरे, डी.जी. गवते,चेतन माळी यांनी केली आहे.

महाराष्ट्र Business Katta












# भारताची वाटचाल डिजिटल क्रांतीच्या दिशेने



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**आज भारत जगभरात 'आयटी हब' म्हणून ओळखला जातोच. तसेच डिजिटल व्यवहारांतही भारताने गेल्या काही काळात मोठी झेप घेतली. तेव्हा, स्वातंत्र्याची पंचाहत्तरी साजरी करत असताना भारताच्या माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती आणि भविष्याचावेध घेणारा हा लेख. उदयोन्मुख भारत आज केवळ आर्थिक महासत्ता आणि लष्करी शक्ती म्हणून नव्हे तर माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात केलेल्या अभूतपूर्व प्रगतीमुळे जगामध्ये ओळखला जातो. एकेकाळी माहिती तंत्रज्ञानाचे जगातील एकमेव बॅक ऑफिस म्हणून ओळखले जाणारे भारत आता डिजिटल तंत्रज्ञान आणि त्याच्या व्यावहारिक वापरात जगातील आघाडीच्या देशांमध्ये सामील झाले आहे.**

यामागे प्रचंड यशस्वी डिजिटल इंडिया मोहीम आहे ज्याने खरोखरच देशाचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. काही दिवसांपूर्वी भारतात आलेले मायक्रोसॉफ्टचे प्रमुख सत्या नडेला म्हणाले की, भारताचे डिजिटल स्वरूप आश्चर्यकारक आहे. वेगवान भारताने तंत्रज्ञानाचा वापर करून भारताला डिजिटली सशक्त समाज आणि ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेत रूपांतरित करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे, मी हे आधी पाहिले नाही. अलीकडेच भारत भेटीवर आलेल्या G20 प्रतिनिधींनी येथे होत असलेल्या डिजिटल परिवर्तनाचे स्वागत केले, भारताला "डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रणेते" म्हटले आणि UPI (युनायटेड पेमेंट्स इंटरफेस) राजस्थानच्या उदयपूर येथील शिल्पग्राम येथे राजस्थानी हस्तकला वस्तू खरेदी करण्यासाठी वापरल्याबद्दल स्वागत केले. सौदी अरेबियाचे प्रतिनिधी राशा खालिद बिन अफतान यांनी सांगितले की, हे अभूतपूर्व आहे आणि सर्व देशांनी भारत आणि त्याच्या उच्च तंत्रज्ञानापासून शिकण्याची गरज आहे.

खरं तर, डिजिटल इंडियाने देशात आर्थिक क्रांती घडवून आणली आहे, ज्याचा गाभा म्हणजे सुशासन आणि नागरिक सशक्तीकरण. अवघ्या काही वर्षांत, डिजिटल इंडियाने भारताला डिजिटली सशक्त समाजात रूपांतरित करण्याच्या प्रयत्नांमध्ये लक्षणीय प्रगती केली आहे. या कार्यक्रमाने इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा यशस्वीपणे विस्तार केला आहे ज्यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल दुरावा दूर करण्यात मदत झाली आहे. आज देशातील बहुतांश ग्रामपंचायती हायस्पीड इंटरनेटने जोडल्या गेल्या आहेत. यामुळे ग्रामीण भागात ऑनलाइन सेवांच्या उपलब्धतेत लक्षणीय सुधारणा झाली आहे आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापराद्वारे नागरिकांना सरकारी सेवांमध्ये प्रवेश करणे सोपे झाले आहे. आजकाल बहुतांश सरकारी सेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत. यामुळे पारदर्शकता वाढण्यास, भ्रष्टाचार कमी करण्यास आणि सरकारी सेवांची कार्यक्षमता सुधारण्यास मदत झाली आहे. या प्रयत्नांचा नागरिकांच्या जीवनावर आणि देशाच्या विकासावर सकारात्मक परिणाम झाला आहे. आरोग्यसेवेपासून ते कृषी, आर्थिक तंत्रज्ञान, शिक्षण आणि कौशल्य विकासापर्यंत, कोविड-19 दरम्यान ज्या पद्धतीने डिजिटल प्रणाली लोकांकडून उपलब्ध करून देण्यात आली आणि स्वीकारण्यात आली त्यावरून असे दिसून येते की देशातील सेवांचे डिजिटल वितरण संपूर्ण आर्थिक परिस्थितीसाठी महत्त्वपूर्ण आहे. डिजिटल इन्फ्रा विकासात भारताच्या प्रगतीने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे विकसनशील देशांनी जगातील सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करावा, असा सल्ला अनेकदा दिला जातो, परंतु डिजिटल इन्फ्रा विकासात भारताच्या प्रगतीने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले आहे. इतर देश आता याची उदाहरणे देत आहेत. आधार, नागरिक-केंद्रित UPI, DigiLocker आणि Co-WIN द्वारे लसीकरणाचा यशस्वी प्रवास यासारखे टप्पे महत्त्वाचे टप्पे आहेत. जीएसटी लागू झाल्यानंतर एंड-टू-एंड डिजिटायझेशन, कर प्रणालीमध्ये डिजिटल पद्धतींचा परिचय आणि प्राप्तिकराचे फेसलेस ई-असेसमेंट यामुळे अर्थव्यवस्थेच्या सुशासन आणि औपचारिकीकरणासाठी मैदान तयार झाले आहे. या परिस्थितीत ई-वे बिल आणि इलेक्ट्रॉनिक टोल संकलन हे देखील महत्त्वाचे टप्पे आहेत. त्यामुळे कर संकलनाचे वातावरण सुधारले आहे. केवळ करचोरी थांबली नाही, तर छोट्या उद्योगांवर लोकांचा विश्वासही वाढला आहे. युनिफाइड पेमेंट इंटरफेस (UPI) अर्थव्यवस्थेच्या दिशेने वेगवान वाटचाल सुरूच आहे आणि युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (UPI) ही आता सर्वाधिक पसंतीच्या पेमेंट पद्धतींपैकी एक बनली आहे याचा पुरावा आहे. UPI ची ही प्रगती उल्लेखनीय आहे. देशातील एकूण डिजिटल व्यवहारांमध्ये UPI चा वाटा (3100 कोटी) 2018-19 या आर्थिक वर्षात 17 टक्के होता, जो पुढील वर्षी 27 टक्क्यांपर्यंत (4600 कोटी व्यवहारांमध्ये 1250 कोटी) वाढला. 2021-22 या आर्थिक वर्षात UPI चा हिस्सा 52 टक्क्यांवर गेला आहे. या कालावधीत एकूण 8840 डिजिटल व्यवहार झाले. 2019 आणि 2022 दरम्यान UPI आधारित व्यवहारांमध्ये (मूल्य आणि संख्या यानुसार) सरासरी 121 आणि 115 टक्के वाढ झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 01 जुलै 2015 रोजी डिजिटल इंडिया मोहीम सुरू केली. ग्रामीण भागांना aaapहाय-स्पीड इंटरनेट नेटवर्कने जोडणे आणि देशातील डिजिटल साक्षरता आणि वापर सुधारणे हा त्याचा प्रारंभिक उद्देश होता. संपूर्ण मोहिमेमध्ये तीन प्रमुख क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते - प्रत्येक नागरिकासाठी उपयुक्तता म्हणून डिजिटल पायाभूत सुविधा, मागणीनुसार प्रशासन आणि सेवा आणि नागरिकांचे डिजिटल सक्षमीकरण. खरंच, डिजिटल इंडिया कार्यक्रम हा भविष्यातील भारताचा कायापालट करण्यासाठी, लोकांना डिजिटल सेवांद्वारे सक्षम बनवण्यासाठी आणि त्यांना चांगले जीवन जगण्यास मदत करणारा रोड मॅप आहे. यामध्ये नॅशनल ई-गव्हर्नन्स मिशन, नॅशनल कॉम्पोनंट्स, स्मार्ट सिटीज इनिशिएटिव्ह आणि डिजीलाइट, डिजिटल इंडियाचा प्रमुख कार्यक्रम यांचा समावेश आहे. भारतीय नागरिकांना आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. डिजिटल इंडियाचे नऊ स्तंभ म्हणजे ब्रॉडबँड महामार्ग, मोबाईल कनेक्टिव्हिटीचा सार्वत्रिक प्रवेश, सार्वजनिक इंटरनेट प्रवेश कार्यक्रम, ई-गव्हर्नन्सः तंत्रज्ञानाद्वारे सरकार सुधारणे, ई-क्रांती - सेवांची इलेक्ट्रॉनिक वितरण, सर्वांसाठी माहिती, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन, नोकऱ्या IT आणि लवकर. साठी पीक कार्यक्रम. यापैकी प्रत्येक क्षेत्र हा एक जटिल कार्यक्रम आहे आणि तो अनेक मंत्रालये आणि विभागांमध्ये पसरलेला आहे. डिजिटल इंडिया अंतर्गत महत्त्वाच्या उपक्रमांमध्ये हे समाविष्ट आहेः डिजीलॉकर, ई-स्वास्थ्य अभियान, ई-शिक्षा अभियान, ई-क्रांती (इलेक्ट्रॉनिक डिलिव्हरी ऑफ सर्व्हिसेस), BHIM – UPI पोर्टल आणि ई-हॉस्पिटल इ. डिजिटल इंडिया कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात 2015 मध्ये झाली असली, तरी त्याची पायाभरणी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी 2002 मध्येच केली होती. 2014 च्या लोकसभा निवडणुकीत, भारतीय जनता पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात डिजिटल इंडियाचा विकास हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट ठेवले होते, ज्याचा उद्देश भारतातील प्रत्येक नागरिकाला डिजिटल पद्धतीने सक्षम बनवणे आणि भारताला जागतिक ज्ञान केंद्र बनवणे, तसेच प्रत्येकाला डिजिटल पद्धतीने सुसज्ज करणे. घरगुती. साक्षर करावे लागले. माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान हे भारताच्या सक्षमीकरणासाठी, नागरिकांची समानता आणि कार्यक्षमतेसाठी महत्त्वाचे सूत्र असल्याचा भाजपचा विश्वास असल्याने या जाहीरनाम्यात ई-गव्हर्नन्सवर विशेष लक्ष देण्यात आले. म्हणूनच जाहीरनाम्यात ब्रॉडबँड, सहभागी प्रशासन, डिजिटल लर्निंग, टेलि-मेडिसिन, ई-लँग्वेज इत्यादींचा उल्लेख करण्यात आला होता. आज या सर्व घोषणांनी ठोस स्वरूप धारण केले आहे. डिजिटल अवलंबनाच्या व्यासपीठावर भारत हा जागतिक स्तरावर एक आघाडीचा देश बनला आहे. आज भारतातील 84 कोटी लोक इंटरनेटशी जोडलेले आहेत. देशात 100 कोटींहून अधिक मोबाईल फोन वापरकर्ते असून त्यापैकी 60 कोटी लोक स्मार्ट फोन वापरतात. भारताची डिजिटल अर्थव्यवस्था 2025 पर्यंत $1 ट्रिलियन ओलांडण्याची अपेक्षा आहे. ई-गव्हर्नन्सशी संबंधित इलेक्ट्रॉनिक व्यवहारांमध्ये मोठी वाढ झाली आहे. भारत नेट कार्यक्रमांतर्गत, सुमारे 3 लाख किलोमीटरच्या ऑप्टिकल फायबर नेटवर्कने 1.15 लाखाहून अधिक ग्रामपंचायतींना जोडले आहे. शहर असो वा खेडे, छोटे किरकोळ विक्रेते असो की मोठ्या व्यावसायिक संस्था, सर्वच UPI वापरत आहेत. क्यूआरकोडच्या मदतीने आज १० रुपये किमतीचे शेंगदाणेही खरेदी करता येतील.




माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी संसदेत डिजिटल पेमेंटची खिल्ली उडवताना म्हटले होते की, गावात कोणी बटाटे आणि टोमॅटो विकत घेऊन साडेसात रुपये डिजिटल पेमेंट करू शकेल का? आज, भारताच्या डिजिटल क्रांतीने केवळ त्यांच्या शब्दांना योग्य उत्तर दिले नाही तर संपूर्ण देश आणि जगाला चकित केले आहे. अवघ्या तीन वर्षांत, 2021 मध्ये, डिजिटल पेमेंटने $ 100 अब्ज (सुमारे आठ लाख कोटी रुपये) चा आकडा गाठला आणि आता डिजिटल व्यवहारांमध्ये जगातील पहिल्या क्रमांकाचा देश बनला आहे. अलीकडेच, 5G लाँच प्रसंगी पंतप्रधान मोदींनी या घटनेचा उल्लेख केला आणि सांगितले की, एक काळ असा होता जेव्हा मूठभर उच्चभ्रू लोक आणि त्यांच्यापैकी काही लोक संसदेत डिजिटल इंडियाची खिल्ली उडवत असत. त्यांना असे वाटायचे की गरीब लोकांकडे क्षमता नाही आणि त्यांना डिजिटल गोष्टी समजू शकत नाहीत. गरिबांना डिजिटलचा अर्थही कळणार नाही, अशी शंका त्यांनी व्यक्त केली. पण देशातील सामान्य माणसाच्या समजुतीत, त्यांच्या विद्वत्तेत,
निःसंशयपणे, डिजिटल इंडिया हा भारताला डिजिटली सशक्त समाजात रूपांतरित करण्याचा एक अतिशय अर्थपूर्ण आणि प्रभावी उपक्रम आहे आणि त्याने आपले ध्येय साध्य करण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. या कार्यक्रमाने इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा यशस्वीपणे विस्तार केला आहे आणि ई-गव्हर्नन्स आणि ई-हेल्थ उपक्रम राबवले आहेत, ज्याचा देशातील नागरिकांना खूप फायदा झाला आहे. डिजिटल इंडियाचे यश डिजिटल साक्षरतेला चालना देणाऱ्या आणि डिजिटल तंत्रज्ञानात प्रवेश वाढवणाऱ्या इतर देशांसाठी एक मॉडेल म्हणून काम करते. एकेकाळी भारत इतर देशांच्या यशात आपल्या प्रगतीच्या युक्त्या शोधत असे, आज तो जगासाठी एक प्रमुख आदर्श बनला आहे. आणि त्याचा गाभा डिजिटल इंडिया आहे. हे त्याचे सर्वात मोठे यश आहे.

# आधी हक्काच्या सोईसुविधा द्या; सवलती देवुन समाजाला आळशी करु नका



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**मित्र हो, आजच्या लिखाणाच्या विषयाचे वेगळे पण जरा हाटकेच आहे. अशा विषयावर लिखाण किंवा भाष्य करत असतांना बहुतांशाची नाराजी ओढवुन घ्यावी लागते. कांहीचे समर्थन जरुर मिळते कांहीचा विरोध ही घ्यावा लागतो. एखाद्या वास्तव विषयाला प्रखरतेने समाजासमोर ठेवणे हेही मोठे जिकिरीचे काम आहे. यापुर्वी अनेक वेळा मि माझ्या सरस्वतीच्या आशिर्वादाने बऱ्याचशा वास्तव विषयाला प्रखरतेने स्पर्श करुन माझे प्रिय वाचक व समाजासमोर ठेवण्याचा नेहमीच प्रयत्न केलेला असल्यामुळे समाजाला सत्य स्विकारण्यापासून दुर जात येत नाही. असे करणे किंवा अशा गोष्टींचा स्विकार न करणे म्हणजे निसर्ग किंवा नैसर्गिक प्रक्रियेच्या विरोधात जावून आपले वर्तन करण्यासारखेच नव्हे काय? ज्याप्रमाणे एखाद्या नैसर्गिक प्रेकियेच्या विरोधात जावून जर आपण काम केले तर त्याच्या विपरित परिणामाला आपणास सामोरे जावून अनेक समस्यासह अडचणीचा सामना करावा लागतो. मी नेहमी म्हणत असतो "प्रवाहात आवश्य वहा पण आपले अस्तित्व कायम ठेवून". माणूस जेंव्हा आपले स्वत्व आणि तत्वासह स्वाभिमान व प्रामाणिकपणा बाजुला ठेवून कार्यरत असतो तेव्हा त्याचे महत्व नगण्य असते. अशा विपरित परिस्थितीत स्वत्वशिल व्यक्तिमत्व किंवा समाज निर्मिती होत नाही. खैर प्रत्येकानीच असे गुण अंगीकारावेत असे अपेक्षित नाही. कधी-कधी वाटते उन्हात चालुन गेल्याशिवाय सावलीची किंमत कळत नाही. दुःखाशिवाय सुखाला महत्व नाही, स्वत्व, स्वाभिमान, कष्ट व प्रामाणिकपणाशिवाय जिवन जगण्यालाही महत्व नाही.**

जगतात तर सर्व जन किड्या मुंगीसारखे पण सिंह म्हणून जगण्यामध्ये जी मजा असते ती किडया मुंगी म्हणून नव्हे. आजच्या विषयाकडे वळण्यापूर्वी विषयातल्या तीन शब्दांकडे नजर टाकणे गरजेचे आहे. पहिला शब्द सोय, दुसरा सुविधा आणि तीसरा म्हणजे सवलत. या तिन्ही शब्दावर प्रकाश टाकण्यापूर्वी अशा विषयावर मला लेखणी चालवण्यासारखे का वाटावे, याचे मुख्य कारण वर्तमान राजकारण व समाज व्यवस्थेचे विद्रुप व किळसावने स्वरूप या लेख शिर्षाच्या तीसऱ्या शब्दाने फार मोठ्या प्रमाणावर उघड होत असल्यामुळे व्यक्तिपरत्वे समाजही दुबळाबनत आहे की काय असे वाटते. सोई सुविधा या सशुल्क व निःशुल्कही असू शकतात. पण सवलतीला कुठलेही शुलक् आकारल्या जात नसल्यामुळे माणसा माणसात व समाजात याचे फायदे घेण्यासाठी नुसतीच चढाओढचं नव्हे तर जिवघेणी स्पर्धा चालु आहे. सवलत या शब्दाचे बिजारोपण मुळातच राजकारणी लोकाकडून मोठ्या प्रमाणावर होत आहे. कारण सवलत या शब्दाचे अमिष दाखविल्याशिवाय राजकिय पुढाऱ्यांचा सत्ता प्राप्तीचा हेतु साध्य होत नाही. सवलती या किती प्रमाणात कुणाला व कशा द्याव्यात याचे ठोस निकष नसले तरी त्या नक्किच मिळणार म्हणून माणसे नेहमीच प्रयत्नशिल असतात. शिवाय त्या नेमक्या कोणत्या घटकाला द्याव्यात व देवू नयेत असा भेदभाव असल्यामुळे आळशी लोकांचे फावून प्रामाणिकपणे कष्ट करून खाणाऱ्याला नाहक त्रास होवून त्यालाही त्या विनासायास मिळाव्यात म्हणून परस्परात स्पर्धा सुरू होवून व्यक्तिपरत्वे समाजात कलह व द्वेष भावना वाढीस लागण्यास्तव प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष खतपाणीच मिळत असते. विनासायास मिळणाऱ्या सवलतीमुळे ऐत खावू वृत्ती वाढून सर्व पुकट मिळत असल्यामुळे प्राणाणिक कष्टाचे महत्व राहत नाही.

मानवी स्वभावात हक्क व कर्तव्याला एक वेगळे महत्व आहे जसे शासक अथवा शासनकर्त्यांनी कांही मुलभुत सोई सुविधा व्यक्तिपरत्वे समाजाला पुरविल्या पाहिजेत कारण समाज कल्याण व देश हितासाठी सार्वजनिक प्राथमिक सोई सुविधा पुरविणे हे शासनकर्ते व राजकिय पुढाऱ्यासह प्रशासनाचेही प्रथम कर्तव्य असते. उदा : अन्न-वस्त्र-निवारा, दळणवळण, शिक्षण व आरोग्यासाठी लागणाऱ्या सर्व प्रकारच्या प्राथमिक सोई सुविधा किंवा गरजा या समाज व जनहितासाठी मोठ्या प्रमाणावर शासक व शासनकर्त्यांनी राबवून विकसित केल्या पाहिजेत. पण शासनकर्त्यांचे त्याकडे जाणून बुजून दुर्लक्ष असते. किंबहुना सवलती देवून समाज व व्यक्तिला आळशी करण्याचे कार्य वर्तमानात सर्वच राजकिय पक्ष पुढाऱ्या-कडुन प्रकर्षाने होत असल्याचे आपण नेहमिच बघतो. उदा. दाखल याची अनेक उदाहरणे आहेत पण मोजक्याच सवलतींचा उल्लेख येथे केलेला बरा. मोफत अन्नधान्य वाटप, मोफत घरकुल, मोफत शिक्षण, मोफत प्रवास सोई सुविधा अशा अनेक प्रकारच्या सवलती मिळवून देणाऱ्या योजना अपेक्षित, उपेक्षित वंचितासाठी शासन राबविते पण खरेच याचा लाभ खऱ्या वंचित, अपेक्षित, उपेक्षितांना प्रामाणिकपणे मिळतो का? व अशा सवतलीचा लाभ घेणारे खरे लाभार्थी याच घटकातील लोक व समाज आहे काय याचे कागदोपत्री प्रामाणिकपणे निरिक्षण व पडताळणी होणे गरजेचे असतांना अशा सवलतीचा लाभ घेणारे खरे लाभार्थी कायम दुर्लक्षित राहून राजकिय व प्रशासकिय पुढारी व अधिकाऱ्यांच्या संगनमताने अशा सवलतीचा लाभ उठविणारेच सद्या जास्त प्रमाणात आहेत. महाराष्ट्र सरकारने जेष्ठ पंच्याहत्तरी ओलांडलेले, गोरगरीबांना मोफत किंवा नाममात्र दराने अन्नधान्य पुरविणे, शैक्षणिक सवलती देणे, शेतकऱ्यांना मोफत विज पुरविणे, कर्ज माफी यासारखी आर्थीक सवलती देणाऱ्या योजना राबविल्या आहेत याचा खरेच प्रामाणिक व कायम आर्थिक विवंचनेत राहणाऱ्या समुदायाला कितपत पुरेपुर फायदे मिळतात याचा कुठेच ताळमेळ लागत नाही. उलट-पक्षी "जिसकी लाठी उसकी भैंस" या उक्ती प्रमाणे धनदांडगे लोकच याचे अधिक लाभार्थी असतात. एकीकडे मध्यम व निम्न मध्यमवर्गिय जनता शासनाचे प्रामाणिक करदाते असुन शासनाला करोडोत महसुली उत्पन्न देवून शासनाची तिजोरी भरतात आणि शासनकर्ते व प्रशासनकर्ते खोलात जावुन खऱ्या लाभार्थ्यांची शहानिशा व चौकशी न करता गरीबांना सवलतीच्या नावाखाली पैश्याची अनाठायी उधळपट्टी करून कर भरणाऱ्यांना वेठीस धरून आपली प्रसिद्धी करून घेतात हे कुठे तरी नक्कीच थाबले पाहिजे. छोट्या-छोट्या गोष्टी असतात गरीबांना मोफत घरकुल, शिक्षण, वैद्यकिय सुविधा अशा अनेक प्रकारच्या सवलतींच्या नावावर सर्रास लुटमारच चालु आहे. परवा कांही जेष्ठ नागरीक बोगस प्रवास फायदा घेतल्याचे निष्पन्न झाले. घरकुल, शिक्षण व इतर सवलतीच्या बाबतीतही सर्रास व राजरोसपणे असे प्रकार कायम घडत असल्यामुळे व मिळणाऱ्या सवलतीमुळे सर्वच वर्गात आळशी व ऐतखावु प्रवृत्ती जोर धरली आहे. जन सामान्याला सवलतीच्या नावावर सर्व ऐते मिळत असल्यामुळे कष्ट करण्याची सवय व इच्छाशक्ती कमी होत आहे जी व्यक्ती व समाज विकासात मोठी बाधा आहे, याची सर्वच स्तरावर प्राणाणिक जाण असणे गरजेचे झाले आहे. एकीकडे समाजातील कांही लोक कायदा व नियमानुसार पैसे मोजून सोईसुविधा मिळवून घेतात त्याचे फायदे त्यांना मिळत नाहीत मात्र दुसरीकडे विनासायास सर्व कांही सवलतीच्या नावाखाली मिळत असल्यामुळे मुजोरी वाढून गुंडागर्दी वाढत आहे.

शासनकर्त्यांनी कर्तृत्व श्रम व गुणवत्तेच्या स्तरावर सामाजीक स्तर वाढवीण्याच्या उपाय योजना राबवाव्यात ज्या की सवलतीच्या आधारावर नव्हेत. विशेषतः जात-पात व धर्माला येथे कोठेही थारा नसावा. लेख शब्द मर्यादे मुळे बऱ्याचशः बाबीचा येथे विस्ताराने उल्लेख शक्य नाही. कायदे व नियमानुसार सर्वत्र समसमान न्यायाचे धोरण ठरवून शासन प्रशासनकर्त्यांनी सवलती देवून लोकांना आळशी करण्यापेक्षा नियमानुसर सोईसुविदा उपलब्ध करुन द्याव्यात जेणे करून भ्रष्टाचार, काळा बाजार थांबुन जनतेला खरे व प्रामाणिक राहण्याची सवय लागेल पण असे प्रामाणिक धेय्य धोरणे राबविणारे शासन व प्रशासनकर्ते आता आहेत तरी कुठे? "आंधळ दळतय आण कुत्र खातय" हीच प्रवृत्ती प्रकर्षीने बळावत आहे. अशा विनासायास सवलती योजनेमुळे सर्वसामान्य प्रामाणिक राहणारा माणुस मात्र सर्वाथाने भरडल्या जावून देशाच्या आर्थिक तिजोरीवर ही नको तो ताण पडुन कर्ज बाजारी होण्याची वेळ आली आहे याचे सोयर सुतक कुणालाच नाही.

जनमतावरुन असे वाटते की, शासन-प्रशासनकर्त्यासह सर्व जनतेने हक्काच्या शास्वत सोईसुविधा जरुन घ्याव्यात परंतु सवलतीचा गैरफायदा घेवून स्वतःचे स्वावलंबीत्व गहाण ठेवू नये. म्हणुन सवलती घेवून याचक व आळशी होण्यापेक्षा स्वावलंबी होवून स्वाभीमानाने जगावे. जयहिंद / इन्क्लाब जिंदाबाद.

# जबाब दो आंदोलनाचे यश – अपयश




प्रा. पी.डी. गोणारकर
संपर्क क्र. : 7972966495


आधुनिक केसरी

**महाराष्ट्रातील सकल मातंग समाजाच्यावतीने २२ फेब्रुवारीला मुंबईतील आझाद मैदान येथे 'जबाब दो' मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.या मोर्चाच्या प्रामुख्याने दोन मागण्या होत्या. एक, अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे अ,ब,क,ड असे वर्गीकरण करण्यात यावे. दोन, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थे (बार्टी) च्या धर्तीवर अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थे (अर्टी) ची स्थापना करण्यात यावी.**

जबाब दो मोर्चाच्या आंदोलनाची ठिणगी समाज मनात पडली व त्याचा बघता – बघता वणवा पेटला यास तात्कालिक कारण म्हणजे, महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक मंत्रालयाने बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांची २३ जानेवारी रोजी तडकाफडकी बदली करून बार्टीच्या महासंचालकपदी सुनील वारे यांची नियुक्ती केली.मातंग समाजाला सुनील वारे यांच्या रूपाने पहिल्यांदाच बार्टीच्या महासंचालकपदी संधी मिळत असल्याकारणाने समाजात हर्षोल्हासाचे वातावरण तयार झाले. अभिनंदनाच्या पोस्ट सोशलमीडियात फिरू लागल्या; मात्र हा आनंद अल्पजीवी ठरला. कारण गजभिये यांनी सुनील वारे यांच्या नियुक्ती विरोधात २७ जानेवारी रोजी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये ( मॅट ) आव्हान दिले आणि मॅटचा निकाल वारेंच्या विरोधात गेला आणि गजभिये पुन्हा रुजू झाले. दुसऱ्या बाजूला शासनावर दबाव आणण्यासाठी महार / बौद्ध समाजाने गजभिये यांच्या बाजूने लॉबिंग सुरु केली. बैठकीचे सत्र सुरू झाले. तसे पाहता गजभिये यांच्या कारकिर्दीवर महार समाज ही खुश नव्हता कारण त्यांनी अनेक योजनात गैरव्यवहार केल्याचा आरोप केला जातो. मात्र बार्टीच्या महासंचालक पदावरील आपली जातीय मक्तेदारी आपल्या हातातून निसटते की काय ? या धास्तीने जातप्रेमी स्लीपरसेल यंत्रणा कार्यरत झाली. पण याचा परिणाम म्हणजे महार / बौद्ध समाजाने मातंग समाजाला आंबेडकरी चळवळीपासून पुन्हा एकदा दूर लोटले. सुनील वारेंची 'नियुक्ती' व धम्मज्योती गजभिये यांची 'गच्छंती' हा प्रशासकीय प्रक्रियेचा नियमित भाग असता तर यावरून गोंधळ उठण्याचे काही कारण नव्हते.मात्र या नियुक्ती व गच्छंतीला महार – मांग संघर्षाची जातीय किनार होती.तसेच बार्टीच्या योजना असो की, आरक्षणाचे लाभ आपल्या हक्काचं सर्व काही ह्या सशक्त जातीच खाऊन जात आहेत. आपल्या घटनात्मक हक्कांचे समन्याय प्रमाणात वितरण होत नाही. परिणामी आपण आरक्षणलाभवंचित आहोत. तसेच गजभिये प्रकरणावरून मातंग समुदायात अशीही भावना तयार झाली की, स्वतःला आंबेडकरांचे अनुयायी म्हणवून घेणारे लोक केवळ आपल्या 'स्वजातीहिताचाच' विचार करतात तर मग आपण ही आपल्या जातीचा विचार का करू नये ? याची तत्कालीन प्रतिक्रिया म्हणजे जबाब दो मोर्चा होता. ह्या दोन्ही बाबी बरोबर की चूक याविषयी हे लिहिण्याचे यालेखाचे प्रयोजन नाही. या मोर्चासाठी समाजातील कर्मचारी, राजकीय पुढारी, काही व्यवसायीकांनी सढळ हाताने मदत केली. सोशल मीडियाच्या युगात बघता – बघता गावात, शहरात मोर्चेबांधणी सुरू झाली. २१ तारखेपासूनच हजारोंच्या संख्येने समाज बांधव हातात लाल व पिवळे झेंड्या सोबत अपेक्षांचे ओझं घेऊन सरकारला जाब विचारण्यासाठी मुंबईच्या दिशेने रवाना झाला. लहू, फुले, शाहू, आंबेडकर व अण्णा भाऊच्या नावांचा जयघोष केला जात होता. आता कसोटी होती आता ती संयोजकांची. महाराष्ट्राच्या काना - कोपऱ्यातून आलेला हजारोंचा जनसमूह तळपत्या उन्हात उघड्यावर बसला होता.दुपारच्या सुमारास भाजपचे विधान परिषदेतील आमदार प्रसाद लाड यांनी भेट देऊन आपण तुमच्या मागण्याशी सहमत आहोत व तुमची भावना सरकार पर्यंत पोहचवू असे आश्वासन देऊन गेले. त्या पाठोपाठ महाराष्ट्राचे उत्पादन व शुल्क मंत्री शंभुराजे देसाई यांनी स्टेजवर येऊन सांगितले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुंबई बाहेर असल्यामुळे मी सरकारचा प्रतिनिधी म्हणून येथे आलो असून आपले निवेदन स्वीकारले आहे. लवकरच आपल्यातील पाच जणांचे शिष्टमंडळ घेऊन मुख्यमंत्र्यांशी भेट घालून देईल. तसेच या विषयावर सरकार सकारात्मक भूमिका घेईल. त्यानंतर, सहकार मंत्री अतुल सावे आले ते ही म्हणाले की, उपमुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस हे बाहेर असल्याकारणाने त्यांच्या वतीने मी आलो आहे. आम्ही आपल्या मागण्याशी सहमत आहोत. सत्ताधारी गटातील आमदार, मंत्री भेट देत असताना विरोधी पक्ष कसे मागे राहतील मग ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत आले.त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले की हे 'खोके सरकार' काही करणार नसून केवळ आश्वासनावर बोळवण करेल.आम्ही अर्टीसाठी आपल्या सोबत असून येणाऱ्या काळात या अनुषंगाने विधिमंडळात आवाज उठविल्या जाईल. यानंतर मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप यांनीही मोर्चाला पाठिंबा दिला. हे सर्व घडत असताना जनतेच्या मनात मात्र सवाल कायम होते आणि जबाब काही मिळत नव्हते. लहुजी शक्ति सेनेचे अध्यक्ष विष्णु कसबे, मानवहित लोकशाही पक्षाचे सचिन साठे यांनीही आपली भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर लोकस्वराज्य आंदोलनाचे अध्यक्ष रामचंद्र भरांडे यांनी मात्र तूफान फटकेबाजी केली. हा मोर्चा म्हणजे कोणाला तरी खुश करण्यासाठी नसून आरक्षणाच्या वर्गीकरणाचे काय करणार ? अर्टीची निर्मिती कधी करणार ? ह्या सवलांचे जबाब घेण्यासाठी आहे. जर मुख्यमंत्री – उप मुख्यमंत्री बंजारा समाजाच्या मेळाव्यात स्वतः जाऊन ५०० कोटींचा निधि देऊ शकतात, बंजारा समाजाच्या विकासासाठी वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्थे ( वनार्टी ) ची घोषणा करू शकतात तर मातंग समाजाची केवळ आश्वसनावर बोळवण का ? मातंग समाज रेशीम बागेच्या किंवा कोणत्याही पक्षाच्या दावणीला आम्ही बांधू देणार नाही असा इशारा ही दिला. आंध्रप्रदेशचे आरक्षण वर्गीकरणाचे नेते मंदाकृष्ण मदिगा, लाल सेनेचे गणपत भिसे, शंकर तडाखे यांनीही आपली भूमिका मांडली. हा मोर्चा यशस्वी झाला की अयशस्वी या विषयी समिश्र



भावना आहेत. महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातून मातंग समाज इतक्या मोठ्या संख्येने पहिल्यांदाच आझाद मैदानावर आला हे या मोर्चाचे यश आहे. पण आपण त्यांना साधी बसण्यासाठी सावली ही देऊ शकलो नाही हे अपयश आहे.मातंग समाज ही हजारोच्या संख्येने रस्त्यावर उतरू शकतो हे आत्मभान या मोर्चाने समाजाला दिले हे या मोर्चाच्याचे यश आहे. पण या रस्त्यावरच्या समाजाच्या पंखात आपणही लढू शकतो हे बळ भरू शकले नाही हे अपयश आहे. समाजातील सर्व संघटनाना व त्यांच्या नेत्यांना एकाच स्टेजवर आणू शकलो हे या मोर्चाचे यश आहे. पण नेत्यांनी जो गोंधळ घालायचा तो घातलाच हे अपयश आहे. आमदार, मंत्री, खासदार यांना आपल्या स्टेजवर येण्यासाठी त्यांच्या कार्यकर्त्यांनी फिल्डिंग लावली किंवा त्यांना आपण मजबूर केलो हे आपले यश आहे. पण त्यांचे आश्वासन म्हणजेच जबाब यावर समाधान मानीत बसलो हे आपले अपयश आहे. पुरोगामी महाराष्ट्राला समाज कल्याण मंत्रीच नाही हे सरकारचे अपयश आहे. पण ज्या मुख्यमंत्रीकडे हे खाते आहे आणि आपला विषय त्यांच्या अधिकारात येतो ते न येता ही आपण मोर्चा यशस्वी झाला मानणे हे अपयश आहे. स्टेजवरील नेत्यांची भाऊगर्दी व त्यांच्या दर्दी कार्यकर्त्यांची गर्दी या विषयी न बोललेले व न लिहिलेलेच बरे. वेगवेगळ्या राजकीय पक्ष्यांतील कार्यकर्त्याच आपल्या नेत्यासमोर मिरविणे आपण नेता खुश होऊन आपल्या पदरी काय टाकेल या विषयीची आस लालसा, त्यांच्या चाहत्यांकडून मिळणारे प्रोत्साहन हा कमालीचा विषय आहे.आपण ज्या पक्षाला फॉलो करतो त्या पक्षांच्या नेत्यांना बोलण्याची संधी देणे आणि अन्य पक्षाचा नेता आला की, आपणच चिथावणी देणे हे मोर्चाचे फलित घिण्यासाठी घातक आहे.

तेथे काही जणांना असे वाटत होते की, फक्त सत्ताधारीच महत्वाचे आहेत. पण संसदीय राजकारणात सत्ताधाऱ्यांसोबत विरोधी पक्ष ही महत्वाचा आहे. खर म्हणजे समाजातील दानशूर लोकांनी ज्या सढळ हाताने मदत केली त्याचे योग्य नियोजन केले असते तर स्टेज समोर टेंन्ट, खुर्च्या सहज लावू शकलो असतो. स्टेज व सामान्य जनता यामध्ये काही अंतर ठेवले असते तर बोलणाऱ्याना आपली भूमिका शिस्तबद्ध पद्धतीने मांडता आली असती. वेगवेगळ्या संघटना प्रमुखांची मोर्चा पूर्वी एक बैठक लावून त्यातून एक कोर कमिटी बनविली असती आणि वक्त्यांची नावे, त्यांची कालमर्यादा तसेच सरकारला धारेवर धरण्यासाठी रणनीती आखली असती आणि मोर्चाचा कालावधी वाढविला असता तर निश्चितच हा मोर्चा अजून उजवा ठरला असता. हा मोर्चा आहे. तो जशी आखणी केली तसा होतीच असा काही नाही पण गोंधळ मात्र टाळता आला असता. असो आजच्या चुका पुढच्या वेळेस टाळून आरक्षणाचे वर्गीकरण होईपर्यंत हा लढा थांबणार नाही. ही अपेक्षा करू या.

# संकटग्रस्त पाक आणि भारतासमोरील आव्हाने




मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली


आधुनिक केसरी

**राजकीय अस्थिरता, आर्थिक संकट आणि दहशतवादी घटनांमुळे पाकिस्तानचे संकट अधिकच गडद होत चालले आहे. पंतप्रधान शाहबाज शरीफ हे देशासमोरील संकट आणि आव्हानांबाबत जनतेला सावध करत आहेत, परंतु समस्यांवर मात करण्यासाठी कोणतीही ठोस योजना मांडण्यात ते सातत्याने अपयशी ठरत आहेत. दैनंदिन वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य जनता त्रस्त असून लोकांचा शासनाप्रती रोष वाढत आहे. परकीय चलन जवळपास संपण्याच्या मार्गावर आहे. अनेक कारखान्यांचा माल पाकिस्तानच्या बंदरांवर पडून आहे, पण तो सोडवण्यासाठी व्यापाऱ्यांना बँकांकडून डॉलर्स मिळत नाहीत.**

ही परिस्थिती पाकिस्तानच्या दुरवस्थेचे वर्णन करते. रशिया-युक्रेन युद्धाचा फटका पाकिस्तानलाही बसला असून, त्यामुळे तिथल्या तेलाच्या किमती वाढल्या आहेत. पाकिस्तान पेट्रोलियम उत्पादनांसाठी आयातीवर अवलंबून आहे. तेलाच्या वाढत्या किमतींमुळे खाद्यपदार्थदेखील चांगलेच महाग झाले आहेत. पाकिस्तानचा लष्करी खर्च खूप जास्त आहे. येथे पायाभूत सुविधांवरील खर्चही कर्ज घेतलेल्या निधीतून केला जातो. पाकिस्तान अभूतपूर्व संकटाचा सामना करत आहे, अशा वेळी सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन समस्या सोडवायला हव्यात. पण राजकीय विरोधाची भावना प्रबळ आहे. माजी पंतप्रधान इम्रान खान यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या विविध खटल्यांमध्ये फौजदारी कायद्यांतर्गत कारवाई सुरू झाली आहे. त्यांच्यावर निदर्शने, तोडफोड, सरकारी मालमत्तेचे नुकसान, सरकारी कामात अडथळा आणणे, सरकारी भेटवस्तू स्वीकारणे, न्यायाधीशाला धमकावणे असे अनेक गुन्हे दाखल आहेत. त्यांच्यावर दहशतवाद प्रतिबंधक कायद्याची कलमेही लावण्यात आली आहेत. या सर्व कृतींकडे राजकीय सूड म्हणून पाहिले जात आहे. गेल्या वर्षी सत्ता गमावल्याने संतापलेल्या इम्रान खान यांना सार्वत्रिक निवडणुका तातडीने घ्यायच्या आहेत आणि यामुळे देशात राजकीय अस्थिरता वाढली आहे. त्यांची पदावरून हकालपट्टी घटनात्मकदृष्ट्या चुकीची होती, असा त्यांचा दावा आहे. तर पाकिस्तानचे विद्यमान सरकार मुदतपूर्व निवडणुकांची मागणी फेटाळत आहे. अंतर्गत अराजकतेशी झगडत असलेल्या पाकिस्तानचे शेजारी देशांशी असलेले संबंधही बिघडले आहेत. भारताबाबतच्या शत्रुत्वाच्या धोरणात कोणताही बदल झालेला नाही आणि काश्मीरवर पाकिस्तानी नेत्यांकडून विषारी आग ओखणे अव्याहतपणे सुरूच आहे. अफगाणिस्तानात तालिबान सत्तेवर आल्यानंतर पाकिस्तानमधील अंतर्गत सुरक्षेचे संकट अधिक गडद झाले आहे. अफगाणिस्तानातील लोक आणि तालिबानला इंग्रजांनी आखलेली ड्युरंड रेषा मान्य नाही. पाकिस्तानमधून अफगाणिस्तानात डॉलरची तस्करी होत आहे. त्यामुळे पाकिस्तानी रुपया कमजोर होत चालला आहे. अलीकडच्या काळात पाक-अफगाण सीमेवर दोन्ही देशांमध्ये हिंसक चकमकी वाढल्या आहेत. त्याचबरोबर तालिबानशी मैत्रीपूर्ण संबंध असलेल्या तहरीक-ए-तालिबान या अतिरेकी संघटनेने पाकिस्तानच्या अनेक भागात दहशतवादी हल्ले केले आहेत. देशात कडक इस्लामिक कायदा लागू करण्यासाठी तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान गेल्या चौदा वर्षांपासून लढा देत आहे. ते देशातील अल्पसंख्याक, महिला आणि उदारमतवाद्यांवर हल्ले करत आहेत. अफगाणिस्तानला लागून असलेल्या सीमावर्ती भागात तो आपले वर्चस्व वाढवण्यात गुंतला आहे, त्यामुळे त्याला या भागांतील पाकिस्तानी लष्कराची तैनाती हटवायची आहे. साहजिकच त्यांची पाकिस्तानी लष्कराशी सतत चकमक होत आहे. पाकिस्तानचे सध्याचे सरकार इम्रान खान यांच्या टीटीपीशी असलेल्या संबंधांवरून त्यांच्यावर निशाणा साधत आहे. शाहबाज शरीफ म्हणतात की इम्रान खान यांनीच तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तानच्या लढवय्यांना सीमावर्ती भागात स्थायिक व्हायला साहाय्य केले, जे आता नासूर झाले आहेत. अफगाणिस्तान हे टीटीपीचे सुरक्षित आश्रयस्थान आहे आणि त्याचे दहशतवादी अनेकदा पाकिस्तानी लष्कर आणि पोलिसांवर हल्ले करून अफगाणिस्तानात लपून बसतात. विशेष म्हणजे दहशतवादी संघटनांना पाठिंबा देण्याबाबत पाकिस्तानच्या राजकीय पक्षांप्रमाणेच लष्कराचीही स्थितीदेखील सारखीच आहे. पाकिस्तानी लष्करात उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे अनेक गट आहेत आणि त्यांच्यात हितसंबंधांवरून प्रचंड संघर्ष आहे. लष्करातील लढाऊ गट एकमेकांविरुद्ध टीटीपीचा वापर करतात. जनरल बाजवा हे लष्करप्रमुख पदावरून पायउतार झाल्यानंतर लगेचच टीटीपीने पाकिस्तानात दहशतवादी हल्ले सुरू करणे हा योगायोग




नसून लष्करातील अधिकाऱ्यांमधील फूट उघड करते. आर्थिक संकटाचा सामना करत असलेल्या पाकिस्तानमध्ये चीनलाही विरोध वाढत आहे. तेथील चिनी अभियंते आणि नागरिकांवरील हल्ले वाढल्याने पाकिस्तानचा हा प्रमुख मित्र राष्ट्रदेखील संतप्त आहे. चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरच्या अनेक प्रकल्पांचे काम यावेळी थांबवण्यात आले आहे. सीपीईसी ( CPEC ) हा चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह'चा अत्यंत महत्त्वाचा पैलू मानला जातो. मध्य पूर्व, आफ्रिका आणि युरोपशी नवीन जमीन आणि सागरी संपर्क वाढवणे हा त्याचा उद्देश आहे. पाकिस्तान सरकार या प्रकल्पाचे वर्णन पाकिस्तानच्या भविष्यासाठी एक योजना म्हणून करते, ज्यामध्ये रस्ते, रेल्वे लाईन, पॉवर स्टेशन आणि औद्योगिक क्षेत्रांचा समावेश आहे.

पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात सोने, तांबे आणि वायूचे मोठे साठे आहेत आणि त्यावर चीनची नजर आहे. बलुचिस्तानमध्ये पाकिस्तानला तीव्र विरोध आहे आणि ते पाकिस्तानपासून आपली ओळख वेगळी करू पाहत आहेत. पाकिस्तान आर्थिक अडचणीतून जात असल्याचे बलुचिस्तानातील लोकांचे म्हणणे आहे. त्याला पैशांची गरज आहे आणि हा प्रश्न सोडवण्यासाठी तो आपला हा प्रदेश चीनला विकण्याचा प्रयत्न करत आहे. दहशतवादी आणि विशेषतः दक्षिण पश्चिम बलुचिस्तान प्रांतातील बंडखोर चीनला या प्रकल्पांपासून दूर राहण्याची आणि पाकिस्तान सोडण्याची किंवा परिणामांना सामोरे जाण्याची वारंवार धमकी देत आहेत. याआधी पाकिस्तानी लष्कराने सीपीईसीच्या सुरक्षेची हमी घेतली होती, पण आता ना पाकिस्तानी लष्कराचा दृष्टिकोन सकारात्मक आहे ना चीनचा त्यांच्या सुरक्षेवर विश्वास आहे. बलुचिस्तानच नव्हे तर संपूर्ण पाकिस्तानातील लोकांमध्ये चीनबाबत अस्वस्थता वाढली आहे. पाकिस्तानचे आर्थिक आणि राजकीय विश्लेषक स्पष्टपणे सांगतात की, चिनी कर्जाच्या अत्यंत उच्च व्याजदरामुळे पाकिस्तानला कर्जाची वेळेवर परतफेड करता येणार नाही. यामुळे चीन पाकिस्तानच्या सार्वभौमत्वावर परिणाम करू शकतो. पाकिस्तानातील सुशिक्षित वर्गही चीन-पाकिस्तान इकॉनॉमिक कॉरिडॉरच्या अटींबाबत साशंक आहे. त्यांचा असा विश्वास आहे की या अदूरदर्शी प्रकल्पाने आधीच रोखीने अडचणीत असलेल्या पाकिस्तानभोवती कर्जाचे आणखी एक जाळे तयार केले आहे आणि त्याच्या दीर्घकालीन आर्थिक अडचणी वाढवल्या आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालात असे म्हटले आहे की, पाकिस्तानच्या विदेशी कर्जापैकी 30 टक्के वाटा एकट्या चीनचा आहे. खरे तर पाकिस्तानच्या कर्जाच्या ओझ्यातील चिनी बँकांचा वाटा आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेच्या कर्जापेक्षा जास्त आहे. सध्या पाकिस्तानची स्थिती श्रीलंकेसारखी झाली आहे. मात्र, पाकिस्तानातील राजकीय परिस्थिती यापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. इथे लष्कर कधीही सरकारची हकालपट्टी करून यंत्रणा ताब्यात घेऊ शकते. साहजिकच, संकटात सापडलेल्या पाकिस्तानमध्ये पुन्हा लष्करी राजवट लादल्यास भारतासाठी परिस्थिती अधिक आव्हानात्मक होऊ शकते. इतिहास साक्षी आहे की जेव्हा-जेव्हा पाकिस्तानमध्ये लष्करी राजवट असते तेव्हा भारतासोबतचा तणाव शिगेला पोहचलेला असतो. काश्मीरच्या सीमेवर विनाकारण गोळीबार, दहशतवादी घुसखोरी आणि दहशतवादी हल्ल्यांचा धोका वाढतो.

# गुरुकुंजात उद्या पहिले सातपुडा साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या संवेदना बहुद्देशीय संस्था संचालित सातपुडा साहित्य परिषदेचे वतीने आयोजित पहिले राज्यस्तरीय सातपुडा साहित्य संमेलन अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथे २६ फेब्रुवारी रोजी होणार असून या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ख्यातनाम साहित्यिका प्रा.डॉ.शोभाताई रोकडे व स्वागताध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक व माजी सिव्हिल सर्जन श्री श्यामसुंदर निकम तर उदघाटक म्हणून ॲड. यशोमतीताई ठाकूर, आमदार तिवसा विधानसभा, माजी मंत्री महिला व बालकल्याण तथा माजी पालकमंत्री अमरावती या उपस्थित असणार आहे. संवेदना बहुद्देशीय संस्थे द्वारा संचालित सातपुडा साहित्य परिषद ही महाराष्ट्रातील प्रतिष्ठित व नामांकित अशी संस्था असून, या संस्थेच्या वतीने वर्षभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. त्याचाच एक भाग म्हणून पहिले सातपुडा साहित्य संमेलन रविवार २६ फेब्रुवारी रोजी अमरावती जिल्ह्यातील





गुरुकुंज मोझरी येथील गुरुदेव अध्यात्म केंद्राच्या सभागृहात होत आहे. या साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी ख्यातनाम साहित्यिका प्रा.डॉ.शोभाताई रोकडे व स्वागताध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक तथा माजी सिव्हिल सर्जन अमरावती श्री श्यामसुंदर निकम व उदघाटक म्हणून माजी मंत्री यशोमतीताई ठाकूर उपस्थित असणार आहेत.

सकाळी 8 ते 10 या वेळात ग्रंथदिंडीने संमेलनाला सुरुवात होणार असून त्यानंतर 11 ते 1 यावेळेत संमेलनाचे उदघाटन, प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन, संकल्पगीत, स्वागतगीत, मान्यवरांचे स्वागत व परिचय, प्रास्ताविक व त्यानंतर सत्कार व पुरस्कार वितरण तथा पुस्तक प्रकाशन सोहळा होईल. दुपारी 1 ते 2 या वेळेत मराठी साहित्यातील "भूमिनिष्ठ जाणिवा" या विषयावर डॉ.मोनाताई चिमोटे अधिष्ठाता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून सदर परिसंवादामध्ये डॉ.राजेश मिरगे, डॉ.राजेंद्र मुंडे, सौ.मंजुषा सावरकर, सहभागी होणार असून श्री राजेंद्र फंड, श्री ज्ञानेश्वर रक्षक व श्री बळवंत भोयर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहे. दुपारी 2.30 ते 3.30 या वेळेत प्रसिद्ध कवी व गझलकार श्री विष्णू सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कविसंमेलन कविसंमेलन होणार असून या कविसंमेलनाचे प्रमुख अतिथी म्हणून श्री भाऊसाहेब थुटे व आबासाहेब कडू उपस्थित राहणार आहेत. दुपारी 3.30 ते 4.30 यावेळेत गझल मुशायरा होणार असून या गझल मुशायऱ्याचे अध्यक्ष प्रसिद्ध गझलकार अनंत नांदूरकर खलिश हे राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून सौ.विजया मारोतकर, विनय मिरासे, रजियाताई सुलताना उपस्थित असतील. दुपारी 4.30 ते 6 यावेळेत सुप्रसिद्ध कवी अशोक थोरात यांच्या अध्यक्षतेखाली खुले कविसंमेलन होणार असून या कविसंमेलनाचे प्रमुख अतिथी म्हणून सौ.शोभा गायकवाड, हेमांगी बोंडे, संजय महल्ले, प्रा. डॉ.मंदाताई नांदूरकर उपस्थित राहतील. सामुदायिक प्रार्थनेनंतर संमेलनाध्यक्षा प्रा.डॉ. शोभाताई रोकडे व स्वागताध्यक्ष डॉ. श्यामसुंदर निकम यांच्या अध्यक्षतेखाली समारोपीय सत्र सायंकाळी 6.30 ते 7.30 या वेळेत पार पडणार आहे या समारोपीय सत्राचे प्रमुख अतिथी म्हणून पंडितजी पंडागडे, आबासाहेब कडू, डॉ. रघुनाथजी वाडेकर उपस्थित राहणार आहे. या भव्य राज्यस्तरीय साहित्य संमेलनामध्ये विविध क्षेत्रातील 20 मान्यवर प्रतिभावंतांना सातपुडा साहित्य जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तरी रसिक साहित्यिक व प्रतिभावंतांनी या संमेलनाला आवर्जून उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक, संवेदना बहुद्देशीय संस्थेतर्फे अध्यक्ष गजानन काकडे, उपाध्यक्ष विशाल मोहोड, सचिव सुयोग राजनेकर, कोषाध्यक्ष सारंग ताथोडे, सहसचिव अजय अडिकने, सदस्य खुशाल गुल्हाने, विशाल कन्हेरकर, अंकुश वानखडे व गौरव कांडलकर तसेचं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवक विचारमंच संस्थापक अमर वानखडे, तिवसा तालुका काँग्रेस महासचिव गौरव ढोरे आदी मान्यवरांनी केले आहे.




# स्वाधार योजनेतील जाचक अटी रद्द कराव्यात; काँग्रेसची तीव्र निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** दि.२३ फेब्रुवारी २०२३ रोजी औरंगाबाद शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाच्या वतीने सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयात तीव्र निदर्शने करण्यात आली, स्वाधार योजनेच्या माध्यमातून गरीब, वंचित, गरजू, होतकरू, गुणवंत विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात यावा हा उद्देश असला पाहिजे, मात्र कार्यलायामार्फत लाभार्थी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना सतत अनेक जाचक अटींना आणि तारखांसंदर्भात भूलथापांना बळी पडावे लागत आहे, महिला विद्यार्थिनींना त्यांच्या लग्नाच्या संदर्भात चुकीच्या पद्धतीने विचारपूस केल्या कारणाने महिलांना नाहक प्रश्नांना सामोरे जावे लागते आहे. कार्यालयातील महिला कर्मचारी विद्यार्थ्यांच्या पालक व नातेवाईक यांना अपमानास्पद वागणूक दिल्याच्या अनेक तक्रारी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेत कुठल्याच प्रकारचा संबंध नसतांना १० वी आणि १२ वी च्या टक्केवारी संदर्भात त्रुटी मुळे विद्यार्थ्यांना योजनेपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला जातो, शैक्षणिक खंड असल्यास लाभ मिळणार नाही असे सांगून लाभापासून दूर देऊन एक प्रकारे गरजू विद्यार्थ्यांना मुद्दामच त्रास दिल्या जाण्याच्या प्रकार बघायला मिळतो. या अनेक जाचक अटी काढून टाकण्यात याव्यात या बाबत निवेदन व निदर्शने करण्यात आली. डॉ.अरुण शिरसाट शहर जिल्हाध्यक्ष औरंगाबाद शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनु. जा.विभाग यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने आणि निवेदन देण्यात आले यावेळी माजी शहर जिल्हाध्यक्ष इब्राहिम पठाण, प्रा. शिलवंत गोपणारायन, संतोष भिंगारे, किशोर सरोदे, आनंद भामरे, हरचरणसिंग गुलाटी, रेखाताई राऊत महिला अध्यक्ष, लतीफ पटेल, राहुल इंगळे, एम. ए. अझहर पर्यावरण अध्यक्ष, संजय डोंगरदिवे, रंजना हिवराळे, मुजफ्फर अली युवक काँग्रेस, इरफान पठाण, अशोक दादा चक्रे, रेखा भिंगारदिवे, शांताबाई बनकर, विजया गायकवाड, भीमराव मोरे, नरेंद्र आटोटे, राहुल कांबळे, गणेश शिंदे, ॲड.संदीप आखाडे, प्रा.राजू शेगावकर, प्रा.प्रमोद धुळे, विलास जनबंधु इत्यादी पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. समाजकल्याण उपायुक्त पी.बी.वाबळे तसेच प्रादेशिक उपायुक्त जयश्री सोनकवळे यांनी आजच प्रलंबित प्रकरणे ज्यामध्ये जुन्या विद्यार्थ्यांना आजच्या आज त्यांच्या खात्यावर स्वाधार ची रक्कम जमा होईल असे सांगितले. बाकीची सर्व प्रकरणे दोन दिवसांत मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

# वंचिततर्फे तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन व निदर्शने

आधुनिक केसरी न्यूज

**हरिदास सराटे**

**खुलताबाद :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर व प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकूर, जिल्हा प्रभारी अरुंधती ताई शिरसाट यांच्या सूचनेवरून विभागीय अध्यक्ष मा.अशोक हिंगे पाटील व औरंगाबाद पश्चिम जिल्हा अध्यक्ष योगेश बन यांच्या मार्गदर्शनाखाली व खुलताबाद तालुकाध्यक्ष मुक्तार भाई सय्यद यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२४ फेब्रुवारी २०२३ रोजी तहसील कार्यालय खुलताबाद येथे धरणे आंदोलन व महाराष्ट्र शासनाच्या विरोधात निदर्शने करून शेतकऱ्यांच्या व सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी दोन प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

*महाराष्ट्रामध्ये कापसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे शासनाचा हमीभाव ६ हजार रुपये असल्यामुळे खाजगी व्यापारी सुद्धा ७ ते ८ हजार रुपये मध्ये खरेदी करत आहेत. हा भाव शेतकऱ्यांना परवडत नाही यामध्ये शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च सुद्धा निघत नाही. अजून शेतकऱ्याचा ७० ते ८० टक्के कापूस घरामध्ये पडून आहे. कापूस पिकला खरा परंतु, अजूनही विकला नाही, कापसाच्या पिकामुळे खाज येऊन शेतकरी बिमार पडत आहे. दिवसरात्र कष्ट करून पांढरं सोनं पिकवलं खरं परंतु बेभाव विकण्याची वेळ आली आहे म्हणून हा कापूस शेतकऱ्यांना विकणे खुप गरजेचे असून त्यांच्या मुला- मुलीचे लग्न, शिक्षण, दैनंदिन गरजा भागवण्यासाठी कापूस विकणे महत्त्वाचे आहे. योग्य हमीभाव न मिळाल्यामुळे व इतर शेतीशी संबंधित प्रश्न निर्माण झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने कापसाला हमीभाव १२हजार रुपये करावा व शासनाने स्वतः कापूस खरेदी करावा. तसेच महाराष्ट्र शासनाने घरगुती वीज बिलाच्या युनिट मध्ये वाढ न करता इतर आकारामध्ये भरमसाठ वाढ केलेली असुन त्यामुळे ती दिसून येत नाही. केलेली विज बिलामधील वाढ ही नागरिकांना परवडणारी नसून ती संपूर्ण जनतेची दिशाभूल करणारी आहे. ती अतिरिक्त वाढ सर्वसामान्य जनतेवर हकनाक पडत आहे. ती अतिरिक्त वाढ तात्काळ रद्द करावी. वरील दोन मागण्यासाठी वंचित बहुजन आघाडी तर्फे तहसील कार्यालय खुलताबाद समोर धरणे आंदोलन, शासनाच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. यावेळी मुक्तार सय्यद, राजाराम घुसाळे, अण्णा बनकर, गणेश तांदळे, पुंडलिक गायकवाड, सुभाष राठोड, सोमीनाथ काळे, रतन कसारे, नारायण तुपे, भावलाल राठोड, सुनील मोरे व आदी वंचित बहुजन आघाडीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते व शेतकरी बांधव आपल्या न्याय हक्कासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईन फुटली

## हजारो लिटर पाणी रस्त्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरातील दयाळनगर प्रभागासाठी पिण्याचा पाणीपुरवठा करणारी पाईपलाईन गेल्या पंधरा दिवसापासून फुटली असून हजारो लिटर पाणी वाया जात आहे. या पाण्यामुळे रस्त्यावर मोठे डबके साचल्याने घाणीचे साम्राज्य पसरले आहे. हे घाण पाणी पुन्हा पाईप लाईनद्वारे नागरिकांना नळाद्वारे वितरित होत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रभाग क्रमांक १५ दयाळनागर येथे सोयगाव नगर पंचायत विभागाच्या सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेच्या पाईप लाईनद्वारे नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. दरम्यान ही पाईपलाईन गेल्या पंधरा दिवसापासून फुटली आहे. पाईप लाईन फुटल्याने पाणी तुबल्याने मोठे डबके साचले आहे. या साचलेल्या पाण्यात दुर्गंधी साचल्याने वराहांचा मुक्त संचार होत आहे. हे दुर्गंधीयुक्त पाणी पाईपलाईन मध्ये जाऊन नागरिकांना नळाद्वारे वितरित होत असल्याने सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले आहे. याची नगर पंचायत प्रशासनाने गंभीरतेने दक्षता घ्यावी व तात्काळ पाईप लाईन दुरुस्ती करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर कृष्णा गवळी, योगेश गवळी, सिंधुबाई गवळे, ईश्वर सोनवणे, प्रमोद तायडे, अक्षय गवळी, पंढरी इंगळे, आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.


नवीन वर्षाचा संकल्प करा
आरोग्याची काळजी हा मंत्र खरा
• घाऊक आणि किरकोळ
• किराणा, सुका मेवा, मसाले
• क्रॉकरी, घरगुती उपकरणे
• प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही
• घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, औरंगाबाद

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती औरंगाबाद

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977



# इतिहासाच्या पुनर्लेखानाची गरज : डॉ. कांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद:** मलिक अंबर, शहाजीराजे, छत्रपती शिवाजी महाराज आणि रयतेचे नाते याबाबतचा जो इतिहास या देशातील इतिहासकारांनी, शाहिरांनी,लेखकांनी मांडला तो धर्माशी निगडित असलेला मांडला. परंतु त्यावेळेचा जो संघर्ष होता तो संघर्ष हा धार्मिक नव्हता तर तो राजसत्तेचा संघर्ष होता. छत्रपती शिवाजी महाराज हे समतावादी आणि विज्ञानवादी राजे होते.तत्कालीन परिस्थिती फार वेगळी होती. त्यावेळेला सत्तेसाठी संघर्ष व्हायचे. परंतु, शिवाजी महाराज हे मुस्लिमद्वेष्टे आणि धार्मिक असल्याचे वर्णन करण्यात आलेले आहे,ते चुकीचे आहे. तसे असते तर त्यांचे आरमार प्रमुख, नौदल प्रमुख आणि अनेक मोठ्या पदांवर मुस्लिम नसते. तर औरंगजेबाकडे दक्षिणेचे सुभेदार म्हणून हिंदू असलेले मिर्झाराजे नसते. हे समजून घेतलं तरी त्यांचा खरा इतिहास समोर येईल आणि सहज समजेल.परंतु आजही आम्हाला चुकीचा इतिहास सांगितला जात आहे,तो पुन्हा नव्याने मांडण्याची गरज आहे. तत्कालीन परिस्थितीमध्ये कुठलाही राजा आपल्या साम्राज्याला सुरुंग लागू नये म्हणून नाते गोते वाढवायचे. औरंगजेबाकडे त्यावेळी दोन लाखांचं सैन्य होतं. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीला घेऊन स्वराज्य निर्माण केलं. त्यामध्ये नेताजी पालकरांसारखा धूर्त,चाणाक्ष, विश्वासू सहकारी होता. त्याला स्वराज्यात मानाचं स्थान होतं. स्वराज्यासाठी तो मुसलमान झाला होता नंतर पुन्हा हिंदू झाला. शिवरायांबद्दल अनेक चुकीच्या गोष्टी लिहिल्या गेल्यात.कल्याणच्या सुभेदाराची सून दरबारात आल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक वाक्य वापरले होते म्हणे! ते धादांत खोटे आहे. हा राजमाता जिजाऊंचा अपमान आहे. कारण,राजमाता इतक्या विलक्षण बुद्धिमत्तेच्या होत्या की, त्यांना त्यावेळेस असं बोलण्याची काही गरजच नव्हती. महात्मा ज्योतिबा फुले यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास सांगितला नसता,त्यांच्या समाधीचा शोध घेतला नसता,त्यांच्यावर पोवाडा रचून राजांचा समतेचा इतिहास सांगितला नसता तर छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव इतिहासातून गायब झाले असते. स्वतंत्र भारताच्या संविधानाची जी चौकट आणि मांडणी आहे,ती सामाजिकदृष्ट्या बहुजन समाजातील अठरापगड जाती,अस्पृश्य जातींना घेऊन जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण केलं,त्यांचा जो पराक्रम मांडला,ते सर्व समतेचे सूत्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या तत्कालीन राज्यकारभारात सापडतं.कारण, डॉ. बाबासाहेबांनी आपल्या एका भाषणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा दाखला देत, इथल्या अस्पृश्य, आदिवासी आणि मागास जातींना जर पुढे केले असते तर हा देश कधीच पराभूत झाला नसता, असे सांगितले होते. म्हणून बाबासाहेब आणि शिवरायांचं नातं काय हे आपल्या लक्षात येतं. महाडचा सत्याग्रह हे त्यातले ठळक उदाहरण! पाण्यासाठी सत्याग्रह करायचा होता, तो कुठे करायचा ? अशी चर्चा झाली. त्यावेळेला डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वांशी चर्चा केल्यानंतर,"जिथून रायगडाचं टोक दिसतं त्या चवदार तळ्यावर आपण सत्याग्रह करायचा. कारण,ज्या रायगडावर तत्कालीन समाजातील धर्मांध ठेकेदारांनी माझ्या शिवरायांचा अपमान केला,त्याच ठिकाणी त्यांचा बदला घेण्यासाठी हा सत्याग्रह महाडला करायचा,असं ठणकावून सांगितलं. हे नातं आहे बाबासाहेब आणि शिवरायांचं! ब्रिटिशांनी येथे आल्यानंतर पहिल्यांदा रेल्वेचे जाळे विणले. दळणवळणाच्या सुविधा निर्माण केल्या.भारतामध्ये इंग्रजांनी ज्यावेळी पहिली रेल्वे चालवली,त्यावेळी तिला 'डाकीन' म्हणून भारतीय लोक तिला पाहून पळत होते. शिक्षणाची गंगाजळी भारतामध्ये प्रत्येक ठिकाणी गेली. त्यामुळे अनेक मागास आणि अस्पृश्य जातींना,बहुजन वर्गातल्या अनेक जातींना शिकता आलं.महात्मा गांधी बॅरिस्टर जीना आणि डॉ बाबासाहेब आंबेडकरांवर इंग्रजांचा प्रचंड विश्वास होता. त्याचे कारण म्हणजे हे तिघेही परदेशात शिकलेले बॅरिस्टर होते. गेल्या आठवड्यात उत्तर प्रदेश मधील एक व्हिडिओ बघितला त्यामध्ये तळ्यावर एक अस्पृश्य महिला आंघोळ करत असताना तिला पाण्याला स्पर्श केला म्हणून तेथील आठ धर्मांध जातीयवाद्यांनी तिची नग्न दिंड काढत मारहाण केली,ही मानसिकता देशाला मारक ठरताना दिसत आहे, तरीही त्यावर कोणीही बोलायला तयार नाही.



# पत्रकारास मारहाणप्रकरणी पत्रकार संरक्षण कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करा

## जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**बुलढाणा :** पिंपळगाव राजा पोलिस स्टेशन हद्दीत क्रिकेट सामान्य दरम्यान दोन गटात झालेल्या हाणामारीचे शुटिंग का केले याचा जाब विचारत पत्रकार महम्मद तौसिफ मो. शफीक, रा. पिंपळगावराजा यांना बेदम मारहाण करणाऱ्यांवर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी शासनमान्य पत्रकार संरक्षण समिती बुलढाणाच्या वतीने जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम बोर्डे व जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत बर्दे यांच्या नेतृत्वात जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांना एका निवेदनाद्वारे केली आहे. महम्मद तौसिफ मो. शफीक हे साप्ताहिक शब्द की गुंज या वृत्तपत्राचे उपसंपादक असून १७ फेब्रुवारी२०२३ रोजी ते सायंकाळी ५ वाजता क्रिकेट सामन्याचे वृत्तांकन करण्यासाठी गेले असता, तेथे व्हिडीओ शुटींग व बातमी संकलन करीत असताना आरोपी मुजफ्फर इनामदार, अजगर इनामदार, शेख जिशान, जुबेर इनामदार, माजिद इनामदार, रजा उल्लाखान, शमीउल्लाखान, शेख उमर सै. शाहीद, इरफान इनामदार यांच्यासह त्यांच्या साथीदारांनी पत्रकार महम्मद तौसिफ मो. शफीक यांना प्रचंड मारहाण करुन गंभीर दुखापत केली. त्यामध्ये त्यांचा एक दात खुडला असून गुप्तमार मोठ्या प्रमाणात आहे. विशेष म्हणजे सदर घटनेची तक्रार पिंपळगावराजा पो.स्टे. येथे दिली असता नाममात्र गुन्हे दाखल करुन प्रकरण निपटण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र पत्रकार शफीक यांना लागलेला मार गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे संबंधीत दोषींवर पत्रकार संरक्षण कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल होऊन सर्व आरोपींना अटक करुन पत्रकार शफीक यांना न्याय दयावा अशी मागणी समितीच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# जन्मदात्यावर केले लेकीने अंत्यसंस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**गंगाखेड :** सेवानिवृत्त प्राध्यापक रंजन लक्ष्मण मोहोळकर वय (५९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी आणि एकुलती एक मुलगी मधुबाला यासोबत सहा चुलत भाऊ, पुतणे असा मोठा परिवार आहे.

इयत्ता फर्स्ट इयर मध्ये शिकत असलेली मधुबाला रंजन मोहोळकर दृढनिश्य करून मी माझ्या वडिलांचा अंत्यविधी संस्कार करणार असल्याचा संकल्प तिने केला. तिच्या संकल्पनेला तिचे आई आणि काका ज्येष्ठ विधीज्ञ संत जनाबाई महाविद्यालयाची उपाध्यक्ष रमेशराव मोहोळकर यांनी संमती देत आदर्श समाज परिवर्तनाचं एक पाऊल पुढे टाकले. दरम्यान, पारंपारिक विचारांना छेद देत सामाजिक परिवर्तनाचा पाऊल ब्राह्मण कुटुंबीय असलेले मोहोळकर परिवारांने घेतल्याचे दिसले. गोदावरी काठावर हिंदू संस्कृती प्रमाणे मधुबाला हिने संपूर्ण अंत्यविधी करत मोठ्या जड मनाने पावलाने आपल्या पित्याच्या चित्तेला अग्नी दिला. याप्रसंगी उपस्थित समाजातील विविध घटकातील लोक हा प्रसंग पाहून भावविवश झाले.



# पक्षापेक्षा सामाजिक कार्य करून युवक, पदवीधर, बेरोजगारांसाठी कामे करू

## आमदार सत्यजित तांबे : काँग्रेस पक्षात आता परत जाणे नको

आधुनिक केसरी न्यूज

**अकोले :** काँग्रेस पक्षात आता परत नको, झाला अन्याय आता ठीक आहे, पक्षापेक्षा सामाजिक कार्य करून युवक, पदवीधर, बेरोजगारांसाठी कामे करू असे प्रतिपादन नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे करीत काँग्रेसमध्ये परत जाण्याचा मार्गाला पूर्ण विराम दिला.

कळस बु येथे आमदार सत्यजित तांबे यांचा सत्कार सोहळा कार्यक्रमात ते बोलत होते. जिल्हा परिषद अर्थ बांधकाम चे माजी सभापती कैलासराव वाकचौरे अध्यक्षस्थानी हे होते. यावेळी काँग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष सोन्याबापू वाकचौरे, भाजपचे तालुका सरचिटणीस भाऊसाहेब वाकचौरे, रिपाई चे तालुका अध्यक्ष राजेंद्र गवांदे, संगमनेर कारखान्याचे संचालक संभाजी वाकचौरे माध्यमिक शिक्षक बँकेचे संचालक आण्णासाहेब ढगे, वीज कामगार पतसंस्थेचे चेअरमन श्रीराम वाकचौरे, उपसरपंच ज्ञानेश्वर वाकचौरे आदी उपस्थित होते.

यावेळी कॉंग्रेसचे जेष्ठ नेते सोन्याबापु गुरूजी वाकचौरे यांनी राजस्थान येथे होणाऱ्या राष्ट्रीय अधिवेशनात डॉ. सुधीर तांबे व आ.सत्यजित तांबे यांचे निलंबन मागे घेऊन पुन्हा घरवापसी होण्याची शक्यता वर्तवली असता आमदार तांबे यांनी आता कॉंग्रेस नको मी अपक्षच ठिक आहे. लोकांनी मला निवडून दिले आहे. स्टेजवर भाजप, राष्ट्रवादी, रिपाई चे नेते असून आता सामाजिक कार्य करण्याचे संकेत दिले. जिल्हा परिषद मध्ये दहा वर्ष माझ्या वर कैलासराव वाकचौरे यांनी अन्याय केला असून अध्यक्षपदाची संधी हुकवली तसेच दहा वर्ष आम्हांला निधी बाबद कळून च दिले नाही अशी मिश्किल टिपणी जोडली.

यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व कळसेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थांनी ढोल ताशाच्या वाद्यांनी तसेच हातानी तयार केलेले सुंदर फुले देऊन स्वागत केले. कळसेश्वर मंदिर व जिल्हा परिषद शाळेचे कौतुक यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास उत्तर देताना आमदार तांबे यांनी अनेक आठवणींना उजाळा देत बेरोजगारी आणि विविध विषयांवर विधानपरिषदेत आवाज उठविण्यार असल्याचे सांगितले. स्वागत व प्रास्ताविक सरपंच राजेंद्र गवांदे यांनी तर सुत्रसंचालन सचिव संघटनेचे अध्यक्ष गणेश रेवगडे यांनी केले तर आभार सागर वाकचौरे यांनी मानले. यावेळी गटशिक्षण अधिकारी पदी जालिंदर खताळ यांची निवड झाले बद्दल जिल्हा परिषद शाळेचा स्वरित बिबवे या विद्यार्थांनी विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळलेले मॉडेलचे विशेष कौतुक केले.

# रेशन कार्डमधील नावे ऑनलाईन करण्यासाठी वर्ष लागते तरी कसे? प्रा. जीवन कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा परिसरातील येथील



सोयगाव तहसील मधील राशनकार्ड मधील ऑनलाईन नावे 'करण्याकरिता एक वर्ष तर कधी कधी दीड वर्ष सुद्धा लागत असून ऑनलाइन नावे करण्याकरता नेमकी अडचण कोणती याचे कारण मात्र सध्या तरी स्पष्ट होऊ शकले नाही. अनेक राशनधारक हे राशनमध्ये आपल्या नवीन सदस्याचे नाव समाविष्ट करत ते असतात. त्यानंतर धान्य मिळावे म्हणून ते नाव ऑनलाईन करावे लागत असतात यासाठी 'घरातील सदस्यांचे सर्व आधार कार्ड झेरॉक्स व राशन कार्ड हे त्या ठिकाणी द्यावे लागते. परंतु सर्व कागदपत्रे दिल्यानंतरही आज अनेक राशनधारकांचे नाव ऑनलाईन झालेले नाही. यामध्ये मोठा घोळ दिसून येत असून 'नेमके ऑनलाईन नाव करण्यासाठी दीड एक वर्ष का लागत आहे याचे उत्तर औरंगाबाद जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी देण्याची नितांत गरज आहे. अनेक सावळदबारा परिसरातील खेड्यापाड्यातील लोक वेळ काढून दुरदुरून सोयगाव येथे येत असतात परंतु ऑनलाईन नावे करणारी कर्मचारी त्यांना उडवा उडवीचे उत्तरे देऊन त्यांना माघारी धाडतात त्यामुळे त्यांच्या पदरी निराशा पडत असून 'ऑनलाइन नावे लवकरात लवकर करून मिळावी सोयगाव तालुक्यातील सर्व राशन धारक'हे लवकरात लवकर जिल्हा पुरवठा अधिकारी यांची भेट मी घेणार असून त्यांना निवेदन देणार असल्याची माहिती प्रा. जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते ता. सोयगाव यांनी बोलताना सांगितले.

# हृदयस्पर्शी स्नेहसंमेलनात देशभक्तीपर गीतांवर विद्यार्थ्यांचा जलवा

आधुनिक केसरी न्यूज



**श्रीक्षेत्र राजूर :** बदनापूर तालुक्यातील बावणे पांगरी येथील ऋषी महाराज आदर्श विद्यालयात नुकतेच हृदयस्पर्शी वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. सुप्त कलागुणांना वाव देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी महाविद्यालयाच्या प्रांगणात वार्षिकस्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. जालना कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती तथा भारतीय जनता पार्टी जिल्हा उपाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या हस्ते वार्षिक स्नेह संमेलनाचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुभाषराव बोडखे,भाजपा जेष्ठ नेते शिवाजी थोटे, विठ्ठलराव टेपले,जगन्नाथ थोटे, मोरे मामा, गणेश बावणे, सरपंच गौतम बोर्डे, सरपंच गणेश महाडिक, सरपंच गणेश कदम, सरपंच सुरेश मुटकुळे, संस्थेचे उपाध्यक्ष सारंगधर बोडखे, प्रा.आसाराम बोटूळे, प्रा. बाळासाहेब बोराडे, सचिव प्रवीण बोडखे, गणेश बोडखे, नायबराव बोडखे, बळीराम बोडखे, अरविंद बोडखे, लक्ष्मण बोडखे, भगवान शिंदे, सुनील बोर्डे, विष्णू मुटकुळे, कृष्णा नरोडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमातून विदयार्थ्यांनी भारतीय संस्कृती, वेशभूषा, लोकगीते, देशभक्ती पर गीते, लावणी, हास्यकल्लोळ,नाटक, चित्रपट व देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर करूनउपस्थितांची मने जिंकली. त्याच बरोबर पर्यावरण, स्वच्छता अभियान, महिला सुरक्षा, स्त्रीभ्रूणहत्या, समाज प्रबोधन या विषयावर प्रकाश टाकून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला. तसेच वैष्णवी कदम, राणी चव्हाण, शुभांगी कदम, विद्या घोडकेवैभवी बावणे या विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून शाळेतील उपक्रमाविषयी माहिती दिली. तर पालकांमधून स्वातीताई हिवाळे आणि मंगलाताई वीर यांनी आपल्या मनोगतातून मुलांच्या सर्वांगीण प्रगतीविषयी समाधान व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांनी वर्षभरामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मान्यवरांच्या हस्ते समूर्तीचिन्ह, बक्षीसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य कृष्णा जाधव,उपप्राचार्य संदीप सोनुने, प्रदीप पाटोळे, लक्ष्मी सोनवणे, शिल्पा जाधव, गुलाब राठोड, अमोल पाटोळे यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# एमएएच-एमबीए-सीईटी २०२३ करिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रिया सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये एमबीए प्रवेशा करिता राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या




एमएएच-एमबीए-सीईटी २०२३ या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची प्रक्रिया गुरुवार, दि.२३ फेब्रुवारी, २०२३ पासून ते शनिवार, दि.०४ मार्च २०२३ पर्यंत सुरु राहणार आहे. पदवी उत्तीर्ण झालेल्या व पदवीच्या अंतिम वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी एमएएच एमबीए-सीईटी २०२३ साठी ऑनलाईन फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरीतील एमबीए विभागात उपलब्ध असल्याची माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली. पदव्युत्तर पदवी असलेल्या एमबीए च्या प्रवेशाकरीता अत्यंत महत्वपूर्ण समजल्या जाणाऱ्या एमएएच-एमबीए-सीईटी २०२३ ही परीक्षा येत्या १८ व १९ मार्च २०२३ या दोन दिवशी होणार आहे. सदर परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची प्रक्रिया गुरुवार, दि.२३ फेब्रुवारी २०२३ पासून सुरु झाली असून ही प्रक्रिया शनिवार, दि.०४ मार्च २०२३ पर्यंत चालणार आहे. खुल्या प्रवर्गासाठी प्रवेश परीक्षा नोंदणी शुल्क रु.१०००/- व अनुसूचित जाती-जमातीसाठी रु.८००/- एवढे असून हे नोंदणी शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. या सीईटी परीक्षांचे फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांकडे आयडेंटी साईज एक रंगीत फोटो, एटीएम कार्ड अथवा ऑनलाईन बँकिंगचा लॉगीन आयडी आणि त्याचा पासवर्ड या बाबी आवश्यक असणार आहेत. या प्रवेश परीक्षेच्या संदर्भात अधिक माहीतीसाठी शासनाच्या https://mbacet2023.mahacet.org या संकेत स्थळावर तसेच स्वेरी अभियांत्रिकीच्या एमबीए चे विभागप्रमुख प्रा.करण पाटील ( मोबा. नंबर– ९५९५९२११५४ ) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# बोडखा येथे शिवाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** बोडखा येथे राजे शिवछत्रपती मित्र मंडळ व बोडखा ग्रामस्थांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती उत्सवात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची रूपरेषाः- 19 फेब्रुवारी रोजी सकाळी9.00 वा. शिवप्रतिमा व शिवचरित्र ग्रंथाची भव्य पालखी मिरवणूक टाळ मृदंगाच्या गजरात निघाली. विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या प्रांगणात शिवरायांच्या आरतीने मिरवणुकीची सांगता करण्यात आली. दिनांक 20 फेब्रुवारी 2023 रोजी सायंकाळी ठीक8.30 ते 11.30 या वेळेत वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या विचारांवर व ग्रामगीता ग्रंथाच्या तत्व प्रणालीवर समाज प्रबोधन करणारे राष्ट्रीय कीर्तनकार प्राध्यापक श्री प्रशांतजी महाराज ठाकरे यांच्या राष्ट्रीय कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तो मोठ्या उत्साहात पार पाडण्यात आला. यावेळी राजे शिवछत्रपती मित्र मंडळाच्या तरुणांनी विशेष सहकार्य करत आपला सहभाग नोंदविला,त्यात भारत जाधव,दिनेश जाधव, योगेश राजगुरू, रवींद्र खंबाट, ज्ञानेश्वर लोंढे, प्रमोद बनसोड, ऋषिकेश कदम, प्रशांत फाटे, रतन बनसोड,कैलास पल्हाळ, राकेश फाटे, एकनाथ जाधव पोलीस पाटील रायभान सोनवणे, बाळकृष्ण लोंढे, प्रकाश जाधव व काकासाहेब लोंढे यांनी विशेष सहकार्य केले. राष्ट्रीय कीर्तनाच्या निमित्ताने बोडखा येथील जि. प.प्रा. शाळा बोडखा, कैलास विद्यालय बोडखा व प्रगती बाल विद्या मंदिर, लोणी या शाळेतील विद्यार्थ्यांच्या भाषणांचा व विविध कलागुणांचा कार्यक्रम सादर केला गेला. यात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना राजे शिवछत्रपती मंडळाच्या वतीने पारितोषिक देण्यात आले.




# भव्य नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भरतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र साबळे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित केले होते. 653 नागरिकांनी याचा लाभ घेतला होता. डोळ्यांची तपासणी केल्यानंतर 60 हुन अधिक रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे निष्पन्न झाले होते. तत्काळ शस्त्रक्रिया करणे गरजेचे असल्याने लायन्स क्लबच्या सहकार्याने मोतीबिंदू असलेल्या सर्व रुग्णांची मोफत शस्त्रक्रिया पार पडली असून मोफत भोजन आणि आवश्यक औषधीसुद्धा मोफत देण्यात आली.भारतीय जनता युवा मोर्चाचे शहर उपाध्यक्ष गणेश गारंडवाल आणि मित्रपरिवरच्या वतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या चेहऱ्यावर समाधानाची भावना होती, रुग्णाच्या चेहरीवरील हसू हेच आमच्या कामाची पावती आहे,हीच पुण्याई आम्हाला आयुष्यभरासाठी पुरेशी आहे अशी प्रतिक्रिया आयोजक गणेश गरंडवाल यांनी दिली.

# संसदरत्न पुरस्कार कामाची पावतीच; खासदार फौजिया खान यांची प्रतिक्रिया



आधुनिक केसरी न्यूज

**परभणी :** संसदेतील सर्वोत्कृष्ट कामगिरीबाबतचा संसदरत्न पुरस्कार आपणास दुसऱ्यांदा जाहीर झाला, ही आपल्या दृष्टीने मोठी आनंदाची, समाधानाची बाब आहे. विशेषतः हा पुरस्कार कामाची पावतीच आहे, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा राज्यसभा खासदार श्रीमती फौजिया तहेसीन अहेमद खान यांनी व्यक्त केली.

श्रीमती खान यांनी यानिमित्त बोलतांना आपण राज्यसभेत विविध मंत्रालयांतर्गत विधेयकांसह अन्य प्रश्नांवर महत्वपूर्ण असे मुद्दे उपस्थित केले. दुरुस्ती सुचवली. त्यासाठी निश्चितपणे बारकाईन अभ्यास केला. त्यातील अनेक बाबी सरकार दरबारी मान्य झाल्या, असे स्पष्ट करीत आपण कर्तव्य भावनेतून प्रामाणिकपणे केलेल्या कामाची निश्चितपणे फलनिष्पत्ती झाली, असे सांगितले. महाराष्ट्रासह मराठवाड्यावर रेल्वे खात्याद्वारे होणारा अन्याय, पाणी पुरवठ्यासह सिंचनाचे प्रश्न, विशेषतः हर घर जल योजना, पंतप्रधान घरकुल योजनेसह अन्य सर्वसामान्य व्यक्तींच्या विषयावर आपला फोकस राहीला, असे त्या म्हणाल्या. संसदेत सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या लोकसभा किंवा राज्यसभा सदस्यांचा दरवर्षी संसदरत्न या पुरस्काराने गौरव होतो. संसदेतील कामगिरी, त्यात सदस्याने मांडलेल्या महत्वपूर्ण व अभ्यासपूर्ण विषयांच्या आधारावरुन सदस्याचा या पुरस्कारासाठी विचार होतो. या वर्षी राज्यसभा सदस्यांपैकी तीघांना संसदरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राज्यसभा सदस्या डॉ. फौजिया खान यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षीही डॉ. फौजिया खान यांना संसदरत्न हा पुरस्कार जाहीर झाला होता. येत्या २५ मार्च रोजी एका विशेष कार्यक्रमात हा पुरस्कार खा. श्रीमती खान यांना प्रदान होणार आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह अन्य मान्यवर व परभणी जिल्ह्यातील विविध पक्षातील लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी श्रीमती खान यांचे अभिनंदन केले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# असंख्य हत्यारे आणणारी टोळी पोलिसांच्या ताब्यात

## नव्या कोऱ्या तलवारींसह आरोपी अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** सध्या धुळे जिल्ह्यात बदल्याची भावना ठेवून असंख्य घटना घडत आहेत त्यासाठी पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांच्या आदेशानुसार संपूर्ण जिल्ह्यात या संदर्भात तपासणी सुरू आहे.अशाच प्रकारे शिरपूर तालुका पोलिसांनी असंख्य हत्यार घेऊन जाणारी गाडी ताब्यात घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. व या उत्कृष्ट कारवाई संदर्भात शिरपूर तालुका एपीआय सुरेश यांना पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते दहा हजाराचे बक्षीस देण्यात आले. काही इसम इंदोर कडून धुळयाकडे गाडीत हत्यार घेवून जात आहेत, अशी बातमी मिळाल्याने सपोनि सुरेश शिरसाठ यांनी पोलीस स्टाफला सदर बातमीची कळवली सुरेश शिरसाठ व पोलीस स्टाफ अशांनी हाडाखेड सिमा तपासणी नाका येथे नाकाबंदी करुन दुपारी ३ वाजता वाहन मारुती सुझुकी कंपनीची इटींगा गाडी क्रमांक एम एच ०४ एफ झेड -२००४ हि येताना दिसली सदर गाडी पोलीसांनी हात देवून गाडी थांबवली असता त्या वाहनातून एकूण



१२ तलवारी, दोन मारुती कंपनीची इटींगा गाडी क्रमांक मुददेमाल मिळून आल्याने तो वाहनासह सदर प्रकरणी १ ) सतपाल गिरधर सोनवणे महादेव मंदीर मागे ता. जि. धुळे, जुन्नेर मारुती मंदीर जवळ, ता.जि. रा . लळींग महादेव मंदीर महादेव मंदीर जवळ, ता. जि. अवधान पाण्याचे टाकी ट्रॅक्टर चालक खाली उतरवून सदर वाहनाची तपासणी करता चॉपर , एक बटनचा चाकू , दोन फाईटर व एक झेड २००४ हिचेसह सुमारे ६,२९ ,१०० / - रुपयेचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे . ट्रॅक्टर चालक रा . लळींग,किरण नंदलाल दुधेकर,विकास देवा ठाकरे,रामा पवार, सचिन राजेंद्र सोनवणे,राजू अशोक पवार, विशाल विजय ठाकरे, संतोष नामदेव,अमोल शांताराम चव्हाण, विठठल हरथा सोनवणे यांचे विरुध्द शिरपूर तालूका पोलीस स्टेशन येथे भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून सदर गुन्हयाचा तपास सपोनि सुरेश शिरसाठ हे करीत आहेत . कारवाई मा.पोलीस अधिक्षक श्री संजय बारकूड सो . मा अपर पोलीस अधिक्षक किशोर काळे सो . व पोलीस अति कार्यभार उपविभागिय पोलीस निरिक्षक श्री अंसाराम आगरकर अधिकारी शिरपूर विभाग शिरपूर यांचे मार्गर्शनाखाली शिरपूर तालुका पोलीस स्टेशनचे सपोनि श्री सुरेश शिरसाठ सो,जाकीरोददीन नसिरोददीन शेख ,चतरसिंग लखा खसावद, पवन रामचंद्र गवळी , संजय काशिनाथ सुर्यवंशी , अरिफ रमजान पठाण , संदीप चंद्रकात शिदे , रोहीदास संतोष, योगेश बाळकृष्ण मोरे , चालक,संतोष शिवाजी पाटील , इसरार जकाउल्ला फारुकी अश्यांनी सदर कारवाई केली आहे

# श्री विठ्ठल कारखान्याच्या व्हाईस चेअरमन प्रेमलता रोंगे यांच्यातर्फे शाळांना जार वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** फेब्रुवारी महिना जसजसा संपत आहे तसतसा उन्हाळा ऋतू जवळ आल्याचे जाणवत आहे आणि त्याचबरोबर उन्हाळ्याची तीव्रताही वाढत असल्याचे जाणवत आहे. जिल्हा परिषद शाळा, खर्डी व खर्डीशी संलग्न गावांतील नऊ शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी वेणुनगर, गुरसाळे येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ.प्रेमलता रोंगे यांच्या तर्फे गोपाळपूर ( ता. पंढरपूर ) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या उपस्थितीत व खर्डी ग्रामस्थांच्या हस्ते थंड पाण्याचे जार वाटप करण्यात आले. पंढरपूर तालुक्यातील खताळ वस्ती, घाडगे वस्ती, रणदिवे वस्ती, चव्हाण वस्ती, जाधव-पाटसकर वस्ती, पाटील वस्ती, मुसलमान वस्ती, काळा खोरा आणि खर्डी या सर्व जिल्हा परिषद शाळांना थंड पाण्यासाठी चांगल्या प्रतीचे जार वाटप करण्यात आले. यावेळी केंद्रप्रमुख दत्तात्रय येडगे, केंद्रीय मुख्याध्यापक मच्छिंद्र जगदाळे, मुख्याध्यापक वाघमोडे गुरुजी, लक्ष्मण भुसे, निळकंठ गोरे, प्रकाश राऊत, गौरीहर उखळे, राजेंद्र भोसले, पिंटू खुळे, शिक्षक दादासाहेब खांडेकर, बालाजी शिंदे, लिगाडे मॅडम, मिलिंद परिचारक, अवधूत मॅडम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष समाधान रोंगे, अर्जुन रोंगे, बापूसो रोंगे, गवळी सर, विकास रोंगे, मोहन रोंगे, शरद रोंगे, पोपटकाका पाटील, अतुल रोंगे, पांडुरंग रोंगे, ग्रा.पं.सदस्य मुलाणी, शाळा व्यवस्थापन सदस्या स्वप्नाली रोंगे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. ऐन उन्हाळ्यात थंड पाणी पिण्यासाठी पाण्याचे जार मिळाल्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळा व्यवस्थापना मध्ये व विद्यार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.





# होसूर येथे संत गाडगे महाराज जयंती साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**निलंगा (जि.लातूर) :** राष्ट्रसंत गाडगे महाराज यांची जयंती होसुर, जि.प.के. प्रा. शाळा होसूर येथे साजरा करण्यात आली. यावेळी शाळेतील सर्व मुला-मुलींना स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगितले. प्रारंभी राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार व श्रीफळ अर्पण केले.

या जयंतीनिमित्त होसूर गावचे उपसरपंच गोविंदराव पाटील व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानोबा बिरादार, मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी व जि.प.के. प्रा. शाळा शिक्षक व शिक्षिका उपस्थित होते. सराटे प्रकाश, सावरीकर श्रीनिवास, वारद विलास,पत्रे सत्यवान, रायाजी दिलीप, सुर्वे विद्याधर, श्रीदेवी पाटील व जि.प.के.प्रा. शाळेचे सेवक सुरवसे व्ही.जी. उपस्थित होते.

# बाबांच्या स्मृतीदिनी तुकाराम वृध्दाश्रमास दिला मदतीचा हात

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** येथील आपले वडील सिताराम साळवे यांच्या व्दितीय स्मृतीदिना निमीत्त तुकाराम आश्रय वृध्दाश्रमास रुपये पाच हजारची आर्थीक मदत सोहम पॅथॉलॉजी लॅब सिंदखेड राजाचे संचालक बाबासाहेब साळवे यांनी केले.

आमचे वडील सिताराम साळवे हे अत्यंत गरीब परीस्थीतीतुन प्रगती करत शासकीय सेवा केली. नोकरीत असतांनासुध्दा त्यांनी भुकेल्याला अन्न, नागडयाला कपडे, उघड्याला चादर, गरम कपडे तर कधी आर्थीक मदत, जेवन कींवा दवाखाना सुध्दा मोफत केला आहे. त्यांनी आम्हा भावंडांनाही उच्च शिक्षीत करुन चांगली वागणुक व शिकवण दिली. त्याचेच फलीत आज आम्ही समाजात ताठ मानेने जिवन व्यतीत करीत आहे. त्यांच्या आडवणींना उजाळा मिळावा तसेच त्यांच्या कार्याचा वसा कायम ठेवत तुकाराम आश्रय वृध्दाश्रमातील वृध्दांच्या जिवनात काही आनंदाचे क्षण मिळावे यासाठी आमच्या साळवे परिवाकडून रुपये पाच हजारांची आर्थीक मदत देण्यात येत आहे, असे प्रतिपादन बाबासाहेब साळवे व सत्यभान साळवे यांनी केले. यावेळी सुखदेव पगारे व कडुबा निकाळजे यांनी सुध्दा प्रत्येकी दोन हजाराची आर्थीक मदत दिली. त्यांनी दिलेल्या आर्थीक मदतीसाठी तुकाराम आश्रय वृध्दाश्रमाचे संचालक प्रशांतभैया डोंगरदिवे व रूपालीताई डोंगरदिवे यांनी आभार व्यक्त केले. यावेळी बाबासाहेब साळवे, सत्यवान साळवे, आप्पासाहेब राजभोज, सुखदेव आढावे, सुखदेव पगारे गुरुजी, दिपक पगारे, गौरव तायडे, सुनिता राजभोज, अनिता चौथमोल, रत्ना तायडे, जया पगारे, वर्षा साळवे, लता साळवे वैरंजा साळवे, विनया साळवे, परी साळवे, समिक्षा साळवे यांच्यासह ईतर नातेवाईक उपस्थीत होते.



# विकासकामांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न काँग्रेसने बंद करावा : आ. रमेश कराड

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** पैशाच्या जोरावर आम्ही काहीही करू शकतो या भ्रमात काँग्रेसवाल्यांनो आता राहू नका. भाजपाच्या विकास कामाचे श्रेय लाटण्याचा प्रकार थांबवा. गेल्या विधानसभा निवडणुकीत आईला विकत घेण्याचे पाप केले. येणाऱ्या निवडणुकीत जनता व्याजासकट बदला घेतल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील खरोळा जिल्हा परिषद गटातील मौजे कारेपूर ७ कोटी ५० लक्ष तळणी ९६ लक्ष यशवंतवाडी १९ लक्ष मोहोगाव ७३ लक्ष रामवाडी ५२ लक्ष खरोळा ३४ लक्ष असे एकूण सहा गावातील तब्बल दहा कोटी ५० लक्ष रुपये खर्चाच्या जल जीवन मिशन अंतर्गत हर घर नल, नल से जल, पंतप्रधान ग्राम सडक योजना, मातोश्री पांदन रस्ता, गावांतर्गत आमदार रमेश आप्पा कराड यांच्या विकास निधीतून सिमेंट रस्ता, २५/१५ योजने अंतर्गत विविध विकास कामे, स्मशान भूमीशेड, सभागृह, ग्रामपंचायत इमारत आदी विविध केंद्र आणि राज्य शासनाच्या निधीतील विकास कामाचा भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळा भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड आणि खासदार सुधाकर शृंगारे यांच्या शुभहस्ते सोमवारी सायंकाळी झाला. कारेपूर येथे झालेल्या जाहीर कार्यक्रमातून आ.



कराड बोलत होते. अध्यक्षस्थानी अँड. ज्ञानेश्वर कापसे हे होते. कार्यक्रमास भाजपाचे जिल्हा सरचिटणीस विक्रमकाका शिंदे, प्रदेश भाजपाचे अमोल पाटील, तालुकाध्यक्ष अँड. दशरथ सरवदे, लातूर ग्रामीणचे अध्यक्ष अनिल भिसे, माजी सभापती बायनाबाई साळवे, माजी सभापती अनंत चव्हाण, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सतीश आंबेकर, महेंद्र गोडभरले, भागवत सोट, सुकेश भंडारे, सिद्धेश्वर मामडगे, वसंत करमूडे, सुरेंद्र गोडभरले, शरद दरेकर, अभिजीत मद्दे, भागवत गीते, रमा फुलारी, नामदेव बोबडे, गोपाळ पडले, शीला आचार्य यांच्यासह अनेकांचे उपस्थिती होती. यावेळी बोलताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, गेल्या ७५ वर्षात देशाची सर्वाधिक सत्ता उपभोगणाऱ्या काँग्रेसने जनतेला पिण्याचे शुद्ध पाणी देऊ शकले नाही. जातीपातीचे राजकारण करून आपसात भांडणे लावली, गरीबी हटावचा नारा देऊन गरिबांना गरीबच ठेवण्याचे पाप केले असल्याचे सांगून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब गोरगरीब गरजूंसाठी घरकुल, शौचालय, गॅस, शेतकऱ्यांना पेन्शन, कोट्यावधी जनतेला मोफत राशन यासह अनेक कल्याणकारी योजनाची प्रभावी करून गरजूंना न्याय देण्याची भूमिका घेतली. देशाला सर्वांगीण विकासाच्या दिशेने घेऊन जात आहेत देशाची शान आणि मान जगात उंचावण्याची काम केले आहे. गेल्या अडीच वर्षांपूर्वी सत्तेवर आलेल्या अभद्र युतीच्या महाविकास आघाडी सरकारने केवळ वसुलीचेच काम केले कोणतेही विकासाची कामे केली नाहीत. राज्यात नव्याने सत्तेवर आलेल्या एकनाथ शिंदे आणि देवेंद्रजी फडणवीस यांच्या शासनाने अनेक जनहिताचे निर्णय घेतले. गावागावातील विकास कामासाठी भरीव निधी दिला. गोगलगाय, सततचा पाऊस, अतिवृष्टी यामुळे नुकसानीत आलेल्या जिल्ह्यातील संकटग्रस्त शेतकऱ्यांना मदत करून दिलासा दिला असल्याचे बोलून दाखविले.

# एमपीएसच्या आंदोलनाला यश, भाजपचेच पूर्ण श्रेय : गजानन जोशी

आधुनिक केसरी

राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या वर्णनात्मक स्वरूपाचा अभ्यासक्रम २०२३ पासून लागू न करता २०२५ पासून लागू करावा. यासाठी मागील तीन दिवसापासून स्पर्धा परिक्षा करणाऱ्या उमेदवारांनी पुण्यात आंदोलन पुकारलं होतं. या आंदोलनात भाजपाचे आमदार अभिमन्यू पवार हे विद्यार्थ्यांच्या खंबीरपणे पाठीशी होते. यावेळी राष्ट्रवादी, काँग्रेसच्या नेत्यांना लक्षात आले की, भविष्यात निर्णय जो होईल तो होईल पण आज आपण पक्ष म्हणून या विद्यार्थ्यांना साथ देणे गरजेचे आहे, हा स्वार्थी उद्देश ठेवून राष्ट्रवादी, काँग्रेस या पक्षांच्या नेत्यांनी उपस्थिती लावली होती. यातच काल राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी आंदोलन कर्त्यांची भेट घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. त्यानंतर २२ फेब्रुवारी रात्री उशिरा भाजपा प्रदेश प्रवक्ते अजित चव्हाण यांनी कार्यकर्त्यांची भेट घेतली होती, आणि दि.२३ फेब्रुवारी २०२३ रोजी आयोगाने ही मागणी मान्य करत ऐतिहासिक निर्णय घेत आयोगाकडून अभ्यासक्रम २०२५ पासून लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. यावरून आता भाजप आणि राष्ट्रवादीमध्ये श्रेयवादाची लढाई सुरू झाली असल्याच्या बातम्या समोर येत असल्यातरीही ही लढाई भाजपा आमदार अभिमन्यू पवार यांनी सक्रियतेने विद्यार्थ्यांसोबत लढली होती, म्हणून हे श्रेय १००% विद्यार्थ्यांमार्फत भाजपलाच मिळणार असल्याने, स्वार्थापोटी वेळेवर उपस्थित राहून इतर पक्षांनी श्रेय लाटण्याचा विचार देखील करू नये, असे परखड मत भाजपा प्रदेश कार्यकर्ते गजानन जोशी यांनी व्यक्त केले आहे.

राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या वर्णनात्मक स्वरूपाच्या परीक्षेसंदर्भातील उमेदवारांची मागणी, कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती व उमेदवारांना तयारीसाठी द्यावयाचा अतिरिक्त कालावधी विचारात घेऊन सुधारित परीक्षा योजना व अभ्यासक्रम सन २०२५ पासून लागू करण्यात येत आहे. असं आयोगाने ट्विट करत म्हटलं आहे.

राज्य सरकारच्या विनंतीला मान देत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विद्यार्थीहिताचा निर्णय घेतला, याबद्दल त्यांचे मन:पुर्वक आभार. आम्ही प्रारंभीपासूनच सांगत होतो की, कुठल्याही स्थितीत विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ देणार नाही. त्यांचे हित आमच्यासाठी सर्वोच्च आहे.



– देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री – महाराष्ट्र



# हिंदू समाजाने जागरूक राहण्याची गरज

## सुनील देवधर : 'राव बेदरकार वादळाचे नाव प्रतापराव' कादंबरीचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** हिंदू समाजाने जागरूक राहण्याची गरज असून बदलत्या काळानुसार सोशल मीडियाचा वापर यासाठी आवर्जून करा आणि हिंदुत्वाचे सोशल मीडिया वॉरियर्स बना, असे प्रतिपादन भाजपचे राष्ट्रीय सचिव सुनील देवधर यांनी केले. स्नेहल प्रकाशनच्या वतीने सौरभ कर्डे लिखित 'राव बेदरकार वादळाचे नाव प्रतापराव' या कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्यात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर एस पी कॉलेजचे माजी प्राचार्य दिलीप शेठ, चित्रपट दिग्दर्शक प्रवीण तरडे, स्नेहल प्रकाशनचे रवींद्र घाटपांडे आणि राजेंद्र बेंद्रे उपस्थित होते. देवधर म्हणाले, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार येण्याअगोदर अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारचा अपवाद वगळला, तर आधीच्या सरकारांनी आणि कम्युनिस्टांनी आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी खरा इतिहास कधीच पुढे येऊ दिला नाही. एका परिवाराला सत्तास्थानी ठेवण्यासाठी देशातील कित्येक महापुरुषांना विस्मरणात ठेवण्याचा घाट घालण्यात आला. केवळ लांगूलचालन करण्यात हिंदूंच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करण्यात आले. आज हिंदू मुलींना असुरक्षित वाटत आहे आणि चित्रपटांतूनहीमनोरंजनाच्या नावाखाली चुकीचे संदर्भ दिले जातात. त्यामुळे हिंदू मुलींना 'लव्ह जिहाद' च्या जाळ्यात अडकवण्याचा डाव आपण सर्व हिंदूंनी ओळखला पाहिजे." सोशल मीडिया हे प्रभावी माध्यम असून त्याचा या षड्यंत्राविरोधात वापर करा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

भाषणादरम्यान इतिहासाचे संदर्भ सांगताना जेव्हा जेव्हा संभाजी महाराजांचा संदर्भ आला. तेव्हा, प्रत्येकवेळी सुनील देवधर यांनी धर्मवीर संभाजी महाराज असा उल्लेख तर केलाच पण सभागृहातील प्रत्येकास त्यांनी धर्मवीर संभाजी महाराज हा जयघोष करायला लावला. या वेळी त्यांनी अनेक अज्ञात वीरांच्या शौर्यगाथा सांगून प्रेक्षकांना खिळवून ठेवले. हिंदुत्वाच्या रक्षणासाठी, पुण्येश्वराच्या पुनर्निर्माणासाठी हिंदूंनी एकत्र येण्याचे आवाहन त्यांनी केले. तरुणांनी छत्रपती शिवाजी महाराजांपासून संयम शिकला पाहिजे, असेही ते म्हणाले.

पुस्तक वाचन ही सर्वात चांगली सवय असल्याचे सांगून प्रत्येक घरात शो केसमध्ये पुस्तके असली पाहिजे, एकमेकांना भेट दिली हिजेत, असे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आल्यानंतर आपल्या देशातील अज्ञात अशा शूर वीरांचा इतिहास बाहेर येऊ लागला आणि त्यातूनच हे सौरभसारख्या तरुण लेखकाने लिहिलेले हे पुस्तक आहे, असेही ते म्हणाले. आपल्या देशाचा स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सुरू आहे आणि आता इथून पुढे अमृतकाळ आहे. भारताची संस्कृती आणि इतिहासातील लोकांचे कार्य किती प्रभावी आणि प्रेरणादायक आहे हे सगळ्या जगाला पटवून देण्याची संधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपलब्ध करून दिली. त्यामुळे नव्या तरुण लेखकांनी पुढे येण्याचे आवाहनदेखील सुनील देवधर यांनी केले.

यावेळी दिलीप शेठ, प्रवीण तरडे तसेच राजेंद्र बेंद्रे यांनी देखील आपले विचार व्यक्त केले, लेखक सौरभ कर्डे यांनी कादंबरी लेखनामागील भूमिका विषद केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रवींद्र घाटपांडे, संचलन प्रसाद गोरे यांनी केले.

# आत्मविश्वासाचा हुंकार म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज : खा. राहुल शेवाळे

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त चेंबूर येथील आर सी एफ कर्मचारी संघ ( बी एम एस ) या कामगार संघटनेच्या वतीने सिंहगड किल्ला ते चेंबूर अशी शिवज्योत आणण्यात आली, शिवज्योतीच्या आगमनाच्या प्रसंगी आर सी एफ चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्रीनिवास मुडगेरीकर, सुभेदार नरवीर तानाजी - सूर्याजी मालुसरे यांचे पोलादपूर तालुक्यातील वंशज रवींद्र मालुसरे, खासदार राहुल शेवाळे, आर सी एफ कर्मचारी संघाचे उपाध्यक्ष संजय उपाध्याय, कार्याध्यक्ष राजेश सिंग, नगरसेवक महादेव शिवगण, माजी नगरसेविका श्रीमती निर्मला सिंग, माजी नगरसेविका राजेश्री पालांडे यांच्यासह विविध संघटनांचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. रवींद्र मालुसरे यांचा यावेळी शाल, पगडी, सन्मानचिन्ह प्रदान करून खासदार राहुल शेवाळे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

खासदार राहुल शेवाळे म्हणाले, मी माझ्या मनगटाच्या बळावर स्वतंत्र राज्य मिळवून रयतेचा राजा होणार. हा स्वाभिमानाचा, आत्मसिश्वासाचा हुंकार त्यापूर्वी तीनशे वर्षे महाराष्ट्र भूमीवर उमटला नव्हता तो शिवाजी महाराजांच्या रूपाने प्रगट झाला.स्वराज्य स्थापन केले आणि ते सुराज्य कसे होईल याकरता ते सतत प्रयत्नशील राहिले. शिवाजी राजांचे कार्य हे आपले आहे असे त्या वेळच्या मावळ्यांना आणि रयतेला वाटत होते त्यामुळे नरवीर तानाजी, बाजी, शिवा काशीद यांनी लढताना आत्मसमर्पण केले.





# तीनशे दुचाकींसह सहाशे मराठमोळ्या वेशभूषेतील महिलांची शिवशाही रॅली

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून वार्ड क्रमांक 24 येथून काढण्यात आलेल्या महिलांच्या शिवशाही रॅलीत सुमारे तीनशे दुचाकींवर सुमारे सहाशेच्यावर महिला स्वार झाल्या होत्या. मराठमोळ्या वेशात सजलेल्या आणि छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ व मावळ्यांचा सजीव देखावा साकारलेल्या या दुचाकीस्वार महिलांनी सुमारे सात किमी दुचाकी चालवल्या. रॅलीला महिलांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

नगरसेवक महेंद्रसिंग ठाकूर डॉ. छाया फालक देशमुख व सामाजिक कार्यकर्ते रूपेश देशमुख यांच्यातर्फे महिलांची शिवशाही रॅली आयोजित करण्यात आली. प्रारंभी सकाळी नऊ वाजता मराठमोळ्या वेशभूषेत आणि शिवराय जिजाऊ व मावळ्यांच्या वेशभूषेत महिला उगले ट्रेडर्सजवळ जमल्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला आ. संजय सावकारे, राजेंद्र चौधरी, महेंद्रसिंग ठाकूर ( पिंटूभाऊ ), नगरसेवक युवराज लोणारी, नगरसेवक राजेंद्र आवटे, परीक्षित बऱ्हाटे, डॉ. सौ. छाया फालक देशमुख, सामाजिक कार्यकर्ते रूपेश देशमुख, सौ. रजनी सावकारे, सौ. महानंदा पाटील, सौ. अनिता आंबेकर, सौ. भारती पाटील ठाकूर, भारती वैष्णव, अजय भोळे, ॲड, तुषार पाटील, किरण पाटील, सारंग पाटील, प्रा. प्रशांत पाटील, डॉ. जगदीश पाटील, डी. के. पाटील, संजीव पाटील, दीनानाथ ओगले यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून शिवरायांची आरती करण्यात आली. त्यानंतर डीवायएसपी सोमनाथ वाघचौरे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते रॅलीला भगवा झेंडा दाखवून सुरूवात करण्यात आली. दोन-दोन दुचाकींसह काढण्यात आलेली रॅली सुमारे एक किलोमीटरपर्यंत लांबली होती. केशप भावसार याने छत्रपती शिवरायांची भूमिका साकारली व उघड्या गाडीतून शिवरायांचे दर्शन घडवले. त्या गाडीच्या मागे महिलांची दुचाकी शिवशाही रॅली जामनेर रोडवरून अष्टभुजा देवी व बाजारपेठ पोलीस स्टेशनमार्गे जावून रॅलीने रेल्वे स्थानकावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याला वळसा घातला. तिथे छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून जिजाऊ वंदना घेण्यात आली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला देखील पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच जळगाव रोडमार्गे गेल्यावर सरदार वल्लभभाई पटेल पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात येऊन ही रॅली मामाजी टॉकीजमार्गे दगडी पुलाखालून टिंबर मार्केटमधील गाडगेबाबा हायस्कूलमध्ये पोहोचली. तेथे रॅलीचा समारोप करण्यात आला. सुमारे सात किलोमीटर ही रॅली चालली. त्यानंतर महिलांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली.

# गरिबांच्या मुलांचे भवितव्य घडविणाऱ्या जिल्हा परिषद शाळेत शिक्षणाचा बोजवारा

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** शिक्षण घ्यावं, घेतले पाहिजे यासाठी सरकार नेहमी प्रयत्नशील असल्याचा आव आणत असल्याचे सोयगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षणावरून सिद्ध झाले आहे. सर्वसामान्य मोलमजुरी करणाऱ्या गोरगरिबांची मुलं सोयगाव येथील जिल्हा परिषद प्रशालेत शिक्षण घेत आहे. शाळा बंद पडावी जणू हे मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद, शिक्षणाधिकारी व शिक्षणसाम्राटांना वाटत आहे. जिल्ह्याला तीन कॅबिनेट मंत्री व दोन केंद्रीय राज्यमंत्री लाभले असतांना देखील तालुक्यात शिक्षणाची वाताहत होत आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे भवितव्य अवलंबून असलेल्या या शाळेत माध्यमिक २७५ व प्राथमिक २२५ अशा एकूण ५०० विध्यार्थी संख्या आहे. मात्र जिल्हा परिषद शाळेला शिक्षकांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम झाला आहे. माध्यमिकसाठी २७५ विध्यार्थी शिक्षण घेत असून माध्यमिक शिक्षणाकरिता शिक्षकांची एकूण नऊ पदे मंजूर असून तीन पदे रिक्त तर एका शिक्षकाचे नुकतेच निधन झाले आहे. प्रभारी असलेले मुख्याध्यापक गिरीश जगताप यांची नुकतीच गटशिक्षणाधिकारी म्हणून पाचोरा जि जळगाव येथे नियुक्ती करण्यात आली असल्याने माध्यमिक करिता चारच शिक्षक कार्यरत असून विज्ञान, मराठी, हिंदी व गणित विषयांचे शिक्षकच नसल्याने विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. तर प्राथमिक शिक्षणासाठी २२५ विद्यार्थी शिक्षण घेत असून पदवीधर शिक्षक आठ पदे मंजूर असून दोन रिक्त तर एक प्रतिनियुक्तीवर असल्याने पाच शिक्षक कार्यरत आहे. जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या शाळेतील शिक्षकांच्या कमी असलेल्या संख्येमुळे शिक्षणाचा बोजवारा उडाला आहे. शालेय शिक्षण समिती व पालक वर्गांचे दुर्लक्ष ही कारणीभूत ठरत असल्याची चर्चा सद्या रंगू लागली आहे. शिक्षकांच्या रिक्त असलेली पदे व विषय शिक्षकांसंदर्भात मुख्यकार्यकारी अधिकारी काय निर्णय घेतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.




दुर्लक्षित असलेल्या सोयगाव तालुक्यात जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या शाळांची शैक्षणिक अवस्था बिकट झाली आहे. सोयगाव तालुक्यात इतर तालुक्यातून किंवा जिल्ह्याच्या ठिकाणांहून बदली झालेला शिक्षक ऐण्यास टाळाटाळ करीत पळवाट शोधण्याचा प्रयत्न करीत असतो असाच प्रकार उघडकीस आला आहे. पदवीधर शिक्षक असलेले रणजित देशमुख यांची बदली सोयगाव येथे झाली होती. दि. १७/१०/२०१८ रोजी सोयगाव येथे रुजू होण्यास हजर झाले. विशेष म्हणजे मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांची प्रतिनियुक्ती औरंगाबाद येथे करण्यात आल्याचा आदेश घेऊन आले. तत्कालीन मुख्याध्यापकाने कोणताही विलंब न करता दि.१७/१०/१०१८ लाच रुजू व कार्यमुक्त केले. याला अर्थकारण की राजकारण म्हणावे. देशमुख यांची २०२३ मध्ये सोयगाव येथून बदली झाली आहे हे विशेष.